## गुड न्यूज! पीएफवर मिळणार ८.२५ टक्के व्याज

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने आर्थिक वर्ष २०२४-२५साठी पीएफ म्हणजेच भविष्य निवार्ह निधीवरील ८.२५% या व्याजदराला अधिकृत मान्यता दिली आहे. यामुळे देशभरातील सात कोटींपेक्षा जास्त पीएफधारकांना त्यांच्या खात्यांवर वार्षिक व्याज जमा होणार आहे. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय कामगार व रोजगारमंत्री मनसुख मांडविया यांच्या अध्यक्षतेखाली ईपीएफओच्या ट्रस्टी मंडळाची २३७वी बैठक झाली होती. या बैठकीत २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी पीएफजमा रकमेवर ८.२५% व्याजदर कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. हा व्याजदर मागील आर्थिक वर्षाशी (२०२३-२४) तुलनीय आहे, ज्यामध्येदेखील हेच दर लागू होते. या शिफारशीला अर्थ मंत्रालयाची आवश्यक मंजुरी नुकतीच मिळाली असून त्यानंतर श्रम मंत्रालयाने ईपीएफओला अधिकृत सूचना दिली आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३०७
www.ramprahar.com

रविवार, २५ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


मुख्यमंत्र्यांनी सादर केला महाराष्ट्राचा रोडमॅप/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

शुबमन गिल भारताचा नवा कसोटी कर्णधार/८


# शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छीमारांना सवलती मिळणार

■ मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांची ग्वाही





**उरण : वार्ताहर**

शेतकऱ्यांना ज्या ज्या सवलती आतापर्यंत मिळत होत्या त्या सर्व सवलती मच्छीमार बांधवांना मिळणार आहेत. या अनुषंगाने शंभर टक्के पूर्तता होण्यासाठी मी व माझे खाते प्रयत्नशील राहीन, अशी ग्वाही मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी दिली. ते करंजा येथील सभेत बोलत होते.

मस्यव्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा मिळाल्याबद्दल कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांचा शुक्रवारी (दि. २३) करंजा येथे जाहीर सत्कार करण्यात आला. त्या वेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते रवी भोईर, कौशिक शाह, तालुकाध्यक्ष धनेश गावंड, शहराध्यक्ष प्रसाद भोईर, गव्हाण-वडघर अध्यक्ष रूपेश धुमाळ, कर्नाळा अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, करंजा मच्छीमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, युवा मोर्चा शहराध्यक्ष निलेश पाटील, जितेंद्र घरत, महेश कडू, गोपीशेठ म्हात्रे, शशी पाटील, मुकुंद गावंड, राजेश नाखवा, हितेश शाह, मनोहर साहातिया, राजू ठाकूर, मनन पटेल, संगीता पाटील, शमिता ठाकूर, सुगंधा कोळी, खोपटे सरपंच विशाखा ठाकूर, निशा म्हात्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह शासनाचे अधिकारी, कोळी समाजातील बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री नितेश राणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने पहिल्या शंभर दिवसात मस्यव्यवसायाला कृषी दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व सवलती आता मच्छीमारांनाही मिळणार असून यामुळे त्यांच्या आयुष्यात बदल घडणार आहे. वीज दरात सवलत, किसान क्रेडिट कार्डचा लाभ, मासेमारी साहित्य सवलतीच्या दरात मिळेल तसेच वादळ किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती आल्यास मदत मिळणार आहे.

करंजा हे देशातील एक नंबरचे बंदर ठरेल व महाराष्ट्राच्या विकासात भर टाकेल, असा विश्वास मंत्री राणे यांनी व्यक्त केला. या वेळी त्यांनी, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी हे समाजातील सर्व घटकांच्या हितासाठी झटत असतात, अशा शब्दांत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आज अनेक महत्त्वाचे प्रकल्प पनवेल आणि उरण तालुक्याच्या अवतीभोवती आले आहेत. पनवेलमधील आंतरराष्ट्रीय विमानतळ दोन ते तीन महिन्यांत सुरू होणार आहे. अटल सेतू हा महाराष्ट्रासह देशाला अभिमान वाटावा असा प्रकल्प उरण तालुक्यात साकारला. त्यामुळे रायगड जिल्हा मुंबईशी थेट जोडला गेला. या माध्यमातून येथील विकासाला चालना मिळाली आहे.

भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व इतर मान्यवरांनीही विचार मांडले. करंजा मच्छीमार सोसायटीचे चेअरमन प्रदीप नाखवा यांनी प्रास्ताविक केले.

### मच्छीमारांच्या मागण्या पूर्ण व्हाव्यात -आमदार महेश बालदी



या वेळी आमदार महेश बालदी यांनी आपल्या भाषणात मच्छीमार बांधवांच्या समस्या अधोरेखित केल्या. करंजा बंदराचे उर्वरित काम पूर्ण होणे बाकी आहे. ते मार्गी लागावे. मोरा, नवापाडा येथील मच्छीमारांना मोबदला मिळावा. रेवस-करंजा ब्रिजमध्ये बाधित होणाऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी. सर्व मच्छीमारांना डिझेल परतावा मिळावा तसेच छोटी बंदरे, पकटी निर्माण कराव्यात याकडे त्यांनी मंत्री नितेश राणे यांचे लक्ष वेधले. केंद्र व राज्य सरकार जनतेच्या हितासाठी कार्यरत आहेत. सरकारच्या माध्यमातून मच्छीमारांचे कल्याण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त कीर्तन महोत्सव

### वारकरी संप्रदायातील ज्येष्ठांच्या उपस्थितीत नियोजन आढावा बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगण्य आणि दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा येत्या २ जून रोजी ७४वा वाढदिवस असून ते अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहेत. त्या अनुषंगाने ३१ मे ते २ जूनपर्यंत पनवेलमध्ये तीन दिवस कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

मंदिरे बांधणे, जीर्णोद्धार तसेच दिंडीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सढळ हस्ते केली आहे. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा आध्यात्मिक उत्सव म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा झाला पाहिजे यासाठी वारकरी संप्रदायातील व्यक्तींनी पुढाकार घेतला आहे. त्या संदर्भातील नियोजन बैठक शनिवारी (दि. २४) खांदा कॉलनी येथे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि वारकरी संप्रदायातील ज्येष्ठांच्या उपस्थितीत झाली.

या बैठकीस भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, राजेंद्र पाटील, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, कोकण दिंडीचे अध्यक्ष पद्माकरमहाराज पाटील, बाळामहाराज भोपी, भोईर महाराज, धाऊमहाराज पाटील, ह.भ.प. सुरेश पाटील, शंकरमहाराज सांगडे, म्हात्रे महाराज, काशिनाथमहाराज पारठे, निवृत्तीबुवा चौधरी, जनार्दन पाटील, ज्ञानेश्वरमहाराज शिंदे, वसंतशेठ पाटील, पुंडलिकमहाराज फडके, मधुकर भगत, वसंत ढवळे, चंद्रकला जायभाये, सुजाता साबळे, गीताताई पाटील, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, शिवकर सरपंच आनंद ढवळे, अनेश ढवळे आदी उपस्थित होते.

या वेळी माहिती देताना आमदार महेश बालदी यांनी सांगितले की, **(पान २ वर..)**



*शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्य अतुलनीय असे आहे. ते अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांची रेलचेल असावी अशी संकल्पना आमदार महेश बालदी यांनी मांडली. त्याची सुरुवात या कीर्तन महोत्सवाने अर्थात विठूरायाच्या नामस्मरणाने होणार आहे. वर्षभर विविध कार्यक्रम होणारच आहेत; त्याबरोबरच भजन महोत्सवही आयोजित करणार आहोत. विशेष म्हणजे हा कार्यक्रम वारकरी संप्रदायाने आपला स्वतःचा कार्यक्रम समजून हाती घेतला आहे. तुमच्या सर्वांच्या सहभागातून हा महोत्सव मोठा होणार असून या महोत्सवात सहभाग घेत आहात, त्याबद्दल ठाकूर कुटुंबाकडून मनस्वी आभार मानतो.*

**-आमदार प्रशांत ठाकूर**

## निवडक

### पाकिस्तानसाठी हेरगिरी; आरोग्य कर्मचाऱ्याला अटक

**कच्छ** : गुजरातमधील कच्छ जिल्ह्यातील सीमावर्ती भागातून दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या एका व्यक्तीला अटक केली आहे. सहदेव सिंह गोहिल असे अटक केलेल्या व्यक्तीचे असून तो आरोग्य कर्मचारी आहे. आरोपीने भारतीय सीमा, बीएसएफ आणि भारतीय नौदलाच्या कारवाया, परिसराचे फोटो आणि इतर संवेदनशील माहिती पाकिस्तानला पाठवली होती. त्याने गुजरातच्या अनेक सीमावर्ती भागांची माहितीही शेअर केली होती.

### प्रसिद्ध अभिनेते मुकुल देव यांचे निधन



**मुंबई** : प्रसिद्ध अभिनेते मुकुल देव यांचे ५४व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांनी मालिकांसह चित्रपटांमध्ये काम केले आहे. मुकुल देव यांनी १९९६मध्ये 'मुमकिन' या मालिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले तसेच त्याच वर्षी त्यांनी सुश्मिता सेनबरोबर 'दस्तक' या चित्रपटातून चित्रपटसृष्टीत पदार्पण केले होते. त्यांनी वेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या.

## अनियंत्रित ट्रेलर पाच वाहनांना धडकला

### एक्स्प्रेस वेवर अपघात; दोघी ठार, चार जण जखमी





**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत शनिवारी (दि. २४) सायंकाळी अनियंत्रित ट्रेलर पाच वाहनांना धडकून दोघी ठार, तर चार जण जखमी झाले आहेत. जखमींना एमजीएम रुग्णालय कळंबोली व जाखोटिया रुग्णालय खोपोली येथे दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे.

मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवर सायंकाळी ४च्या सुमारास एक ट्रेलर चार कार व एक बसवर धडकला. या अपघातात अक्षता अक्षय हळदणकर (वय ३०, रा. मुंबई) आणि श्रेया संतोष अवताडे (वय १६) दोन महिलांचा मृत्यू झाला असून पाच जण जखमी आहेत.

जखमींमध्ये सारिका अवताडे (वय ३८), सारिका विजय जाधव (वय ९), अवनिश विजय जाधव (वय ३), वसुधा जाधव व ट्रेलरचालकाचा समावेश आहे.

या अपघातानंतर एक्स्प्रेस वेवर एक तास वाहतूक ठप्प झाली होती. आयआरबी यंत्रणा व सामाजिक कार्यकर्ते यांच्या मदतीने अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात येऊन मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

## हरिहरेश्वर प्रदक्षिणा मार्ग तात्पुरता बंद

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

पावसाळ्याची चाहूल लागताच समुद्राने धोकादायक रूप धारण केले आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही २५ मेपासून हरिहरेश्वर येथील विष्णूतीर्थाकडे जाणारा प्रदक्षिणा मार्ग तात्पुरता बंद करण्यात आला आहे. हरिहरेश्वर ग्रामपंचायत व देवस्थान समितीच्या वतीने हा निर्णय पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने घेण्यात आल्याची माहिती माजी सरपंच अमित खोत यांनी दिली.

दक्षिण काशी म्हणून ओळखले जाणाऱ्या हरिहरेश्वर देशभरातून हजारो भाविक आणि पर्यटकांना आकर्षित करत असते. निसर्गसौंदर्य, शांतता आणि आध्यात्मिक वातावरण यामुळे हे ठिकाण पर्यटकांचे आवडते ठिकाण बनले आहे, मात्र गेल्या काही वर्षांत सेल्फी काढण्याच्या नादात किंवा समुद्रकिनाऱ्याच्या खडकांवर जाऊन फोटो घेण्याच्या मोहात अनेक पर्यटकांनी आपला जीव गमावला आहे.

पर्यटकांनी समुद्रकिनाऱ्यावर असलेले स्टॉलधारक, स्थानिक पर्यटन व्यवस्थापक तसेच आपल्याला राहण्यासाठी जागा दिलेल्या स्थानिकांकरवी योग्य मार्गदर्शन घ्यावे. कोणत्याही धोकादायक ठिकाणी जाण्याचे टाळावे. स्थानिक प्रशासन आणि देवस्थानच्या सूचना पाळूनच पर्यटनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वैष्णवी हगवणे प्रकरणात निलेश चव्हाण सहआरोपी



**पुणे : प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात दाखल गुन्ह्यात कलम वाढ करून निलेश रामचंद्र चव्हाण (रा. कोथरुड, पुणे) यालादेखील सहआरोपी करण्यात आले. पोलिसांकडून निलेश चव्हाणचा शोध सुरू आहे.

वैष्णवी शशांक हगवणे हिने १६ मे रोजी आत्महत्या केली होती. या प्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत असलेल्या बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहिता कलम ८० (२), १०८, ११५ (२), ३५२, ३५१ (२), ११८ (१), ३ (५) प्रमाणे बावधन पोलिसांनी गुन्हा नोंद केला. हुंडाबळी आणि मृत्यूस कारणीभूत ठरणे असा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, वैष्णवीच्या मृत्यूनंतर तिचे दहा महिन्यांचे बाळ निलेश चव्हाण याच्याकडे असल्याचे समोर आले. त्यानंतर वैष्णवीचे बाळ कस्पटे कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आले, मात्र निलेश चव्हाण याच्याकडे असताना बाळाची हेळसांड झाली अशी तक्रार कस्पटे कुटुंबियांनी केली. त्यानुसार बावधन पोलिसांनी गुन्ह्यातील कलमांमध्ये वाढ केली. वैष्णवीच्या आत्महत्येनंतर दाखल केलेल्या हुंडाबळी आणि मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या गुन्ह्यात ही कलम वाढ केली आहे. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा, २०१५ या कायद्याच्या कलम ७५, ८७ प्रमाणे गुन्ह्यात कलम वाढ झाली आहे.

## मान्सून केरळ किनारपट्टीवर दाखल

■ दोन-तीन दिवसात महाराष्ट्रात आगमनाचा अंदाज

**पुणे : प्रतिनिधी**

मान्सूनला प्रगती करण्यास पोषक वातावरण मिळाल्यामुळे शनिवारी (दि. २४) मान्सूनने केरळच्या किनारपट्टीवर धडक मारली. दरम्यान मान्सून वेगाने प्रगती असून येत्या दोन ते तीन दिवसात महाराष्ट्रात दाखल होईल, असा अंदाज हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार यंदा पोषक स्थितीमुळे १३ मे रोजीच मान्सून अंदमान, निकोबार बेटांसह बंगालच्या उपसागराच्या काही भागात दाखल झाला होता. वास्तविक पाहता एरवी मान्सून २० ते २५ मेच्या दरम्यान दाखल होत असतो, मात्र यंदा तो तेरा दिवस आधीच दाखल झाला.



बंगालच्या उपसागरातील वातावरणातील बदल, अरबी समुद्रात तयार झालेले कमी दाबाचे पट्टे यामुळे मान्सून पुढे सरकण्यास अनुकूल स्थिती तयार झाली. त्यामुळे शनिवारी मान्सून केरळच्या किनारपट्टीसह माहे, दक्षिण अरबी समुद्र तसेच अरबी समुद्राचा पश्चिम मध्यभाग, लक्षद्वीपपूर्ण, कर्नाटकचा काही भाग, मालदीव, कोमोरीन, तामिळनाडूचा काही भाग, मध्यपूर्व उत्तर बंगालचा उपसागर, ईशान्य भारतातील मिझोरोम राज्यापर्यत मान्सूनने मजल मारली आहे.

अनुकूल स्थितीमुळे मान्सून वेगाने प्रगती करीत आहे. त्यानुसार येत्या दोन ते तीन दिवसात संपूर्ण अरबी समुद्र, गोवा, महाराष्ट्राचा काही भाग, कोकण, आंध्र प्रदेश, कर्नाटकचा काही भाग, मध्यपूर्व उत्तर अरबी समुद्र, ईशान्य भारतातील काही राज्ये, सब हिमालयीन भाग, पश्चिम बंगाल, सिक्कीम या ठिकाणी दाखल होणार आहे.

## पनवेल परिसरात दोन नवीन कॉर्ड लाईनला रेल्वे मंत्रालयाची मंजुरी

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई परिसरात रेल्वेची क्षमता वाढवणे आणि कामकाज सुव्यवस्थित करण्याच्या उद्देशाने रेल्वे मंत्रालयाने पनवेल-सोमटणे आणि पनवेल-चिखलेदरम्यान एकूण ७.५४ किमी लांबीच्या कॉर्ड लाईन्स बांधण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. ४४४.६४ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प मध्य रेल्वेकडून राबविला जाणार आहे.

पनवेल हे मुंबई उपनगरीय रेल्वेच्या हार्बर मार्गावरील एक महत्त्वाचे टर्मिनल आहे, जे उत्तरेकडे दिवा, दक्षिणेकडे रोहा, पश्चिमेकडे जेएनपीटी आणि पूर्वेकडे कर्जत असे अनेक दिशांना जंक्शन म्हणून काम करते. सध्या ग्रेड-सेपरेटेड क्रॉसिंग नसल्यामुळे इंजिन रिव्हर्सल झाल्यामुळे परिचालनसाठी विलंब होतो. या आव्हानांवर मात करण्यासाठी दोन कॉर्ड लाईन्स प्रस्तावित करण्यात आल्या आहेत आणि आता त्यांना मान्यता देण्यात आली आहे.

यामध्ये जेएनपीटी-कर्जत कॉरिडॉरवर दिवा-पनवेल लाईन फ्लायओव्हरमार्गे कॉर्ड लाईन, काळुंद्रे गाव केबिन आणि सोमटणे स्टेशनदरम्यान दुसरी कॉर्ड लाईन आहे. या नवीन लिंक्समुळे रेल्वेची क्षमता लक्षणीयरीत्या वाढेल आणि गर्दी कमी होईल, ज्यामुळे प्रवासी आणि मालवाहतूक गाड्यांची वाहतूक सुरळीत आणि जलद होईल अशी अपेक्षा आहे.

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीसाठी निधी

**मुंबई : प्रतिनिधी**

शेतकरी आत्महत्या प्रकरणातील मृताच्या वारसाला वेळीच मदत मिळावी यासाठी राज्य शासनाकडून २० कोटींचा निधी सर्व विभागीय आयुक्तांना उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला असल्याची माहिती मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले, राज्यामध्ये नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेरीचा तगादा या तीन कारणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसाला मदत दिली जाते. महसूल, कृषी, गृह आणि सहकार विभागामार्फत तपासणी करून ही मदत दिली जाते.

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसाला मदत करण्यासाठी विभागीय आयुक्त तथा नियंत्रक अधिकारी, कोकण यांना १२ लाख, पुणे एक कोटी सहा लाख, नाशिक तीन कोटी ३९ लाख, छत्रपती संभाजीनगर चार कोटी ९२ लाख, अमरावती सहा कोटी ७६ लाख आणि नागपूर विभागीय आयुक्त यांना तीन कोटी ७५ लाखाचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेला हा २० कोटींचा निधी मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता राज्यातील उर्वरित जिल्हाधिकाऱ्यांना विभागीय आयुक्तांमार्फत वितरीत करण्यात येणार आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसास तातडीने मदत देण्यासाठी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात उणे प्राधिकार पत्रावर निधी आहरीत करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. यामुळे निधी अभावी आणि निधी मागणी प्रस्ताव पाठवून त्यास शासनाची मंजुरी घेणे या कारणास्तव मदत देण्यासाठी होणारा विलंब टाळला जाणार असल्याचेही मदत व पुनर्वसनमंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले.

# पीएम मोदींसमोर मुख्यमंत्र्यांनी सादर केला ‘महाराष्ट्र २०४७’चा रोडमॅप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकार आणि देशातील सर्व राज्यांसोबत विकसित भारताचे स्वप्न २०४७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र पूर्ण क्षमतेने सज्ज आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीतील निती आयोगाच्या बैठकीत शनिवारी केले. राज्यामध्ये २०३० पर्यंत ५२ टक्के ऊर्जेची निर्मिती ही हरित स्रोतांतून केली जाईल, असे ते म्हणाले. केंद्र सरकारकडून महाराष्ट्राच्या विविध प्रकल्पांना आणि योजनांना सतत मिळणाऱ्या पाठबळासाठी मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान मोदी आणि केंद्र सरकारचे आभार मानले.



निती आयोगाच्या बैठकीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘ऑपरेशन सिंदूर’ बद्दल भारतीय सैन्याचे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानले तसेच अभिनंदन केले. या वेळी त्यांनी महाराष्ट्राची भविष्यातील वाटचाल स्पष्ट केली. ते म्हणाले की, राज्यात ४५ हजार ५०० मेगा वॅट अतिरिक्त ऊर्जा खरेदीचे करार करण्यात आले आहेत. यातील ३६ हजार मेगा वॅट ही हरित ऊर्जा आहे. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.०च्या माध्यमातून १० हजार कृषीफिडर्सवर १६ हजार मेगा वॅट क्षमतेचे प्रकल्प सुरू करण्यात आले असून, त्यातील १४०० मेगा वॅटचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत, असे ते म्हणाले.

राज्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी डिसेंबर २०२६ पर्यंत शंभर टक्के वीज दिवसा उपलब्ध होईल आणि ती सौर प्रकल्पांतून असेल, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात १०० गावांत सौरग्राम योजना सुरू असून, १५ गाव संपूर्णत: सौर ऊर्जाग्राम झाले आहेत, असे ते म्हणाले. पंप स्टोरेजसाठी नवीन धोरण आखण्यात आले असून, ज्यात ४५ पीएसपीसाठी विविध विकासकांसोबत १५ करार करण्यात आले आहेत. याची एकूण क्षमता ६२ हजार १२५ मेगा वॅट इतकी असून, ३.४२ लाख कोटींची गुंतवणूक यातून होईल. ९६ हजार १९० इतके रोजगारसुद्धा निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय धोरणानुसार, महाराष्ट्र सरकारनेदेखील ‘महाराष्ट्र २०४७’ असे लक्ष्य ठेवले आहे. तीन टप्प्यांमध्ये यासाठी काम करण्यात येणार आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्स आणि २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्सची करण्याचा मुख्य उद्देश असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात २०२४-२५ या पहिल्या तिमाहीत देशात सर्वाधिक १.३९ लाख कोटींची परकीय गुंतवणूक झाली आहे. महाराष्ट्रात नीती आयोगाच्या मार्गदर्शनात एमएमआर क्षेत्राला ग्रोथहब म्हणून आम्ही विकसित करीत असून, ज्यातून २०४७ पर्यंत या क्षेत्राला १.५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करणे हा उद्देश साध्य करायचा आहे. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष वित्तीय मदत व्हावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

**वेव्हज परिषदेतील करार**

महाराष्ट्राचे ६० लाखांहून अधिक एमएसएमई उद्यम पोर्टलवर नोंदणीकृत आहे. हा देशातील सर्वाधिक आकडा आहे. मुंबईत वेव्हज परिषदेच्या माध्यमातून दोन जागतिक स्टुडियोसाठी पाच हजार कोटींचे सामंजस्य करार झाले, मुंबईत आयआयसीटीची स्थापना, एनएसईत वेव्हज इंडेक्सचा शुभारंभ तसेच युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्याशी करार झाल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**कुंभमेळ्यासाठी केंद्राची मदत मिळेल**

नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०२७ मध्ये असून, त्यासाठी केंद्राचे मार्गदर्शन आणि आर्थिक मदत महाराष्ट्राला मिळेलच, असा विश्वासदेखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी निती आयोगाच्या बैठकीत व्यक्त केला.

### कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेचा दुसरा टप्पा

# कोकण महसूल विभागात महावितरणच्या चार कार्यालयांनी मारली बाजी

**कल्याण : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध दहा विषयांवर शंभर दिवसांचा राज्यस्तरीय कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम घोषित केला होता. दुसऱ्या टप्प्यातील निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यात महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभाग कार्यालयाने बाजी मारली आहे.

कल्याणस्थित कोकण प्रादेशिक विभाग कार्यालयाला द्वितीय, कल्याण परिमंडल कार्यालयास तृतीय तर कल्याण मंडल-१ कार्यालयास प्रथम आणि अहिल्यानगर मंडल कार्यालयास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक जाहीर झाले आहे. कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी सर्व पुरस्कारप्राप्त कार्यालयांच्या प्रमुखांचे अभिनंदन केले आहे.

मुख्यमंत्र्यांनी शंभर दिवसांचा कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम सुरू केला होता. हा उपक्रम राज्यातील सर्व ३५८ तालुक्यातील दहा हजार शासकीय कार्यालयांमध्ये राबविण्यात आला. सर्व शासकीय विभागांच्या प्रत्येक महसुली विभागातील प्रादेशिक, जिल्हा व तालुका स्तरावरील उत्कृष्ट तीन कार्यालयांची नुकतीच घोषणा करण्यात आली. महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाने प्रादेशिक पातळीवरील द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर जिल्हा स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत कल्याण मंडल-१ कार्यालयाने प्रथम क्रमांकाला गवसणी घातली आहे. सोबतच नाशिक महसूल विभागात जिल्हा स्तरावर अहिल्यानगर मंडल कार्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेसाठी वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोयीसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर आदी निकष होते. गेले शंभर दिवस या कार्यालयांनी ठरलेल्या निकषांवर किती काम केले, त्यावरून निकाल घोषित करण्यात आला आहे. यात महावितरणच्या बहुतांश कार्यालयांनी सरस कामगिरी करत या स्पर्धेत सर्वच निकषांवर आघाडी घेत पारितोषिकांना गवसणी घातली.

महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील, नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे, जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता इब्राहिम मुलानी, रत्नागिरी परिमंडलाचे मुख्य अभियंता अनिल डोये यांनी ही नेत्रदीपक कामगिरी केली.

# अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर एटीव्ही बाईकची वृद्धाला धडक

**अलिबाग :** समुद्रकिनारी शनिवारी (दि.२४) सकाळी एका एटीव्ही बाईकने वृद्ध पर्यटकाला धडक दिली. ज्यात पर्यटक जखमी झाला. यापूर्वीही अलिबाग बीचवर असाच प्रकार घडला होता. त्यामुळे अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटकांच्या सुरक्षेचामुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

एटीव्ही बाईक समुद्रकिनाऱ्यावर बेदरकारपणे चालवल्या जातात. त्यामुळे अपघात होतात. अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर होत असलेल्या अपघातांमुळे स्थानिक आणि पर्यटकांमध्ये नाराजी पसरली आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी एटीव्ही बाईकवाल्यांवर कारवाई करावी, अशी मागणी होऊ लागली आहे.



# अलिबाग वडखळ मार्गावर वाहतूक कोंडी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग ते वडखळ मार्गावर प्रवास करणारया प्रवाशांना शनिवारी दिवसभर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. १० ते १५ मिनीटांच्या प्रवासाला दीड ते दोन तास लागत होते ही वाहन कोडी फोडताना पोलीसांची दमछाक होत होती. या कोंडीमुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला

मे महिन्यातील शेवटचा विकेंड असल्याने पर्यटक मोठ्या प्रमाणावर घराबाहेर पडले आहे. अलिबाग मुरूडकडे येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी असल्याने अलिबाग वडखळ मार्गावर वाहनांची संख्या वाढली होती. त्यातच लग्नसराई असल्याने वराडी मंडळींची ये जा सुरू होती. त्यामुळे या मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. लग्नासाठी निघालेले नवरदेवदेखील या कोंडीत अडकून पडले होते.

रुग्णवाहिकांनादेखील यातून वाट काढणे अवघड होवून बसले होते. पोयनाड, धरमतर, पेझारी आणि कार्लेखिंड या ठिकाणी वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या होत्या. या मार्गावर वाहतूक पोलिसांची संख्या आवश्यकतेपेक्षा कमी असल्याने कोडी फोडताना पोलिसांना मोठी कसरत करावी लागत होती.



# पोलादपूर येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर

## डॉ. सीमा रानडे यांचे मार्गदर्शन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड अलिबाग आणि इंडियन सोसायटी ऑफ अनेस्थेशियॉलॉजिस्ट कोकण ब्रँचच्या संयुक्त विद्यमाने पोलादपूर येथे तहसिल कार्यालयामार्फत आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरामध्ये महाड येथील कौन्सिलींग अनेस्थेशियॉलॉजिस्ट डॉ.सीमा रानडे आणि आपदा मित्रांनी प्रात्यक्षिक आणि तोंडी मार्गदर्शनाद्वारे तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील आणि सरकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले.



या मॉन्सूनपूर्व तयारी आणि युध्दजन्य परिस्थितीतील प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनावेळी निवासी नायब तहसिलदार नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सहगटविकास अधिकारी हंबीर, ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.पाटील, डॉ.राजेश पाटील, आपत्ती निवारण प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी इंडियन सोसायटी ऑफ अनेस्थेशियॉलॉजिस्ट कोकण ब्रँचच्या महाड येथील कौन्सिलींग अनेस्थेशियॉलॉजिस्ट डॉ.सीमा रानडे यांनी विविध प्रकारच्या सर्पदंश, विषारी औषध खाणारी अथवा नाणे, गोटी व तत्सम पदार्थ घशात अडकलेल्या बालकांवर प्रथमोपचार, कार्डियाक अरेस्टवरील वेगवेगळया प्रकारची फिजिओथेरेपी याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

या वेळी आपदामित्रांतर्फे अमित खैरे, अमिताभ जाधव, संकेत कासारे, संतोष मोरे, नाजीम तिवडेकर, विजय अवघडे आदींनी प्रात्यक्षिकांसमवेत तोंडी मार्गदर्शन केले. या वेळी सर्पमित्र संघटनेचे दिनेश दरेकर तसेच तालुक्यातील रेस्क्यू टीमचे अरुण मोहिते, लक्ष्मण कळंबे, विजय परांजपे, गणेश येरुणकर, दत्ताराम पवार, किसन सिंग, गणेश मोरे, दिनेश मोरे तसेच दीपक उतेकर यांनीही उपस्थित राहून विविध प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला.

या वेळी विंचू अथवा सर्पदंशावेळी तातडीने वैद्यकीय उपचार होण्यापूर्वी बाधित व्यक्तीला कोणती गोळी द्यायची म्हणजे रूग्णालयामध्ये पोहोचेपर्यंत रूग्ण दगावणार नाही, याबाबत काळभैरवनाथ रेस्क्यू टिमचे मार्गदर्शक व संस्थापक दीपक उतेकर यांनी मार्गदर्शन केले.

या एकदिवसीय प्रशिक्षण शिबिरामध्ये यापूर्वी आपत्ती व्यवस्थापनासाठी विविध ग्रामपंचायतींना वाटप करण्यात आलेल्या उपकरणांचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरवठा विभागाचे अव्वल कारकून आबा जगताप यांनी केले.

# निवृत्त अधिकाऱ्याची २७ लाखांची फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

खासगी वीज कंपनीतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची २७ लाखांची फसवणूक झाली. ट्रेडिंग करून नफा कमवण्याच्या मेसेजला भुलून त्यांनी ऑनलाईन रक्कम गुंतवली होती. महिन्याभरानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली.

नवी मुंबई पोलीस सातत्याने सायबर क्राईमबाबत जनजागृती करत आहेत. मोबाईलवरदेखील याबाबत जनजागृती सुरू आहे, मात्र तरीही नागरिकांकडून जास्त पैसे कमावण्याच्या लालसेपोटी कोणत्याही योजनांमध्ये पैसे गुंतवणे सुरूच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पोलीसदेखील हतबल होऊ लागले आहेत.

नेरूळ परिसरात राहणाऱ्या ६५ वर्षीय निवृत्त व्यक्तीला व्हॉट्सअॅपवर ट्रेडिंगची लिंक आली होती. त्याला प्रतिसाद दिल्यानंतर तिघांनी त्यांच्यासोबत संवाद साधून एका कंपनीचे नाव वापरून गुंतवणूकदार होण्यास सुचवले. गुंतवणुकीतून नफा मिळण्याची हमी दिली. त्यांच्यातर विश्वास ठेवून त्यांनी महिनाभरात २७ लाख रुपये गुंतवले. मोबदला मिळाला ना गुंतवलेली रक्कम परत मिळाली. यावरून फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त कीर्तन महोत्सव

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासारखे दानशूर आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्व जिल्ह्यात दुसरे झाले नाही. त्यामुळे त्यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस वर्ष संपूर्ण वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमांनी साजरा करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. अमृत महोत्सवी वर्षाच्या पदार्पणानिमित्त आध्यात्मिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, कला अशा क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्यात येणार असून कीर्तन महोत्सव हा पहिला आध्यात्मिक कार्यक्रम असणार आहे. यामध्ये संगीत भजन, हरिपाठ, हरी कीर्तन आणि आध्यात्मिक क्षेत्रातील ज्येष्ठांचा सन्मान करण्यात येणार आहे.

मान्सूनपूर्व पाऊस आणि हवामान विभागाच्या सूचना लक्षात कीर्तन महोत्सव खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर निश्चित करण्यात आला असून महोत्सव यशस्वी करण्यासाठी १३ मुख्य समित्या स्थापन करण्यात आल्याचेही आमदार महेश बालदी यांनी सांगितले, तर अनंतामहाराज पाटील यांनी या महोत्सवाची रूपरेषा आपल्या प्रास्ताविकातून दिली.

# पालघर जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी वीजपुरवठा पूर्ववत

**कल्याण : प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात शुक्रवारी (दि.२३) दिवसभर वादळी वाऱ्यासह झालेल्या बेमोसमी पावसाने वीज वितरण यंत्रणेची मोठ्या प्रमाणात हानी झाली. परिणामी बाधित झालेला वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी प्रयत्नांची शिकस्त करत अहोरात्र काम करून शनिवारी दुपारपर्यंत बहुतांश ठिकाणी वीजुपरवठा सुरळीत केला. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी स्वत: उपस्थित राहत शनिवारी दिवसभर दुरूस्तीच्या कामांबाबत अत्यावश्यक निर्देश दिले.

शुक्रवारच्या वादळी पावसाने ३३ केव्ही विक्रमगड वीज वाहिनीवरील आठ खांब सावडे गावाजवळ जमीनदोस्त झाले होते. त्यामुळे ३३/२२ केव्ही विक्रमगड उपकेंद्र शुक्रवारी सायंकाळपासून बंद आहे.

या उपकेंद्रावरून निघणारे ११ व २२ केव्हीचे भोपोडी, चिल्लर, वाडा, हमरापूर, वासा उपकेंद्रवारील ग्राहकांचा वीजपुरवठा बाधित झाला. तर मनोर गावाजवळ चार खांब तर जव्हार ते मोखाडा वीज वाहिनीचा एक खांब पडला होता.

या आपत्तीत उच्चदाब व लघुदाब वाहिनीचे एकूण ४० विजेचे खांब कोसळले होते. सोबतच विविध भागात वृक्ष उन्मळून पडल्याने व झाडांच्या फांद्या पडल्याने वीजवाहिन्या बाधित झाल्या होत्या.




# साथरोगविषयक जनजागृती शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप अथवा डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रांतर्गत पावसाळा कालावधीत प्रत्येक आठवड्याला एक दिवस विशेष हिवताप अथवा डेंग्यू जनजागृती शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. शिबिरांना भेटी दिलेल्या नागरिकांमध्ये हिवताप अथवा डेंग्यू व साथरोगाबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

येणारा पावसाळा कालावधी लक्षात घेता १६ ते २१ मे २०२५ या कालावधीत २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत कार्यक्षेत्रातील खाजगी वैद्यकिय व्यावसायिक व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील सर्व कर्मचाऱ्यांची सभा घेण्यात आली. या सभेमध्ये खाजगी वैद्यकिय व्यावसायिक यांनाही पाचारण करून हिवताप अथवा डेंग्यू नियंत्रणाबाबत बनविलेली ध्वनीचित्रफित दाखवण्यात आली.



याप्रमाणे नमुंमपा कार्यक्षेत्रात जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचून जनजागृती करण्याकरिता २२ मे २०२५ रोजी २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध ठिकाणी जाहीर शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांमध्ये १०,०२१ नागरिकांनी भेट दिली असून, ६४७ रक्तनमुने घेण्यात आले आहेत.


शिबिरांचे वैशिष्टय म्हणजे यामध्ये नॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून, तसेच नागरिकांना डासांच्या आळ्या प्रत्यक्ष दाखवून तसेच पाणी साठवून ठेवलेले ड्रम हे ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याबरोबरच घराभोवती व घरांतर्गत असणाऱ्या डासोत्पत्ती स्थानांची माहिती करून देणे, पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे तसेच आठवड्यातून एक दिवस त्या स्वच्छ करुन कोरड्या ठेवणे, भंगार साहित्य व टायर्स इ. नष्ट करणे, छतावरील प्लास्टीक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे व ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे, त्याचप्रमाणे घर व परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी उकळून पिणे, भाजीपाला स्वच्छ धुवून वापरणे, उघड्यावरचे अन्न खाणे टाळणे याबाबत नागरीकांना अवगत करुन आवाहन करण्यात आले.

आरोग्य विभागाच्या अशा कार्यवाहीसोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवणे, आजुबाजूचा परिसर अथवा टेरेसवरील भंगार नष्ट करणे आदी बाबींवर लक्ष दिले तर नवी मुंबईत हिवताप अथवा डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल. तरी सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी यामध्ये संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## निवडक

### सफाई करणारा व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** तळोजा येथील जागृती रिटॅबीलिटेशन सेंटरचे परिसरामध्ये साफसफाईचे काम करीत असताना रुग्ण



कोठेतरी निघुन गेला असल्याची घटना घडली आहे. मिंटा कुमार असे या व्यक्तीचे नाव असून त्याचे वय ५३ वर्षे, रंग गोरा, उंची पाच फुट एक इंच, अंगाने जाड, नाक सरळ, डोळे काळे, केस पांढरे व समोरून टक्कल पडलेला, दाढी-पांढरी लहान, अंगात फिकट गुलाबी गोल गळ्याचा टीशर्ट व काळी पेंट घातलेली आहे. त्याला भाषा हिंदी बोलता येत असून या व्यक्तीबाबत कोणालाही काही माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे (०२२२७४१२३३३) किंवा पोलीस नाईक सुर्यकांत शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### रसायनीत हॉटेलमध्ये चोरी

**मोहोपाडा :** रसायनीतील गणेशनगर येथील अपुर्वा हॉटेलमध्ये कोणीतरी अज्ञात चोरट्याने मॅनेजर शंकर कोच्यु शेट्टी यांच्या संमतीशिवाय स्वत:चे फायद्याकरीता लबाडीच्या इराद्याने हॉटेलच्या उघड्या खिडकीवाटे आत प्रवेश करून हॉटेलच्या गल्यातून ५०० रुपयांच्या भारतीय चलनातील ४० नोटा घेऊन वीस हजार रोख रक्कम चोरी करुन चोरटा पसार झाला. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार चौरे अधिक तपास करीत असून याबाबत रसायनी पोलिसांत नोंद झाली आहे.

### खासदार श्रीरंग बारणेंचा सत्कार

**उरण :** खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना आठव्यांदा संसद रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा शिवसेना उरण शहर प्रमुख सुलेमान शेख यांचे वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख अतुल शेठ भगत, महेंद्र पाटील, मिशन बॉस मानवाधिकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मोहसीन भाई शेख आदी उपस्थित होते. या सर्व पदाधिकाऱ्यांनी बारणे यांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# जेएनपीए बंदर परिसर लवकरच कंटेनरमुक्त होणार

## अवजड वाहने हटविण्याच्या उपाययोजनांसाठी बैठक

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील अपघातांना कारणीभूत ठरणाऱ्या अवजड कंटेनर ट्रेलर वाहनांपासून मुक्त करण्यासाठी जेएनपीए प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. जेएनपीएच्या बंदरातील वाहतूक विभागाचे अधिकारी, बंदर परिसरातील गोदाम प्रशासन आणि वाहतूक पोलीस अधिकारी यांची जेएनपीए प्रशासन भवन येथे महत्वाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत बंदर परिसरातील महामार्गांवर उभी करण्यात येणारी अवजड वाहने हटविण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यामुळे कंटेनर वाहनमुक्त मार्ग होण्याची आशा निर्माण झाली आहे. उरण तालुक्यातील विविध सामाजिक संस्थांनी एकत्रित मिळून अपघात निवारण समिती घटीत करण्यात आली आहे. या संस्थेच्या माध्यमातून नवी मुंबईचे वाहतूक पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी बैठक घेऊन मुख्य व सेवा मार्गांवर उभ्या करण्यात येणाऱ्या अवजड कंटेनर वाहने मुक्त मार्ग करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर त्याचा आढावा घेण्याचेही ठरविण्यात आले होते. त्यानुसार बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत वाहतुकीशी संबंधित विभागांना अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची सूचना करण्यात आली होती.

या बैठकीला जेएनएचे विश्वस्त दिनेश पाटील, माजी विश्वस्त भूषण पाटील, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील आदी उपस्थित होते.



**संबंधित प्रशासकीय यंत्रणांना सूचना**

चालकांसाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यात यावे. सेवा मार्गांवर वाहने उभी करू नयेत. बंदर विभागाने मागणी पेक्षा अधिक वाहने गोदाम परिसरातील मागवू नये. खड्डे असलेल्या मार्गाची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी व मार्गांवर सुरक्षा पट्टे मारण्यात यावेत आणि पाथदिवे सुरू करावेत, अशा सूचना संबंधित प्रशासकीय यंत्रणांना दिल्या आहेत.



**जेएनपीएच्या वतीने आयोजित करण्यात आ लेल्या बैठकीला बंदराचे प्रतिनिधी, कंटेनर यार्ड आणि गोदाम चालक यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. त्यानुसार वाहतूक विभागाला आवश्यक त्या सुविधा पुरविण्याची चर्चा करण्यात आली.**

**-एस.के. कुलकर्णी**, व्यवस्थापक जेएनपीए, वाहतूक विभाग

**कंटेनर वाहनमुक्त महामार्ग करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कामाला सुरुवात केली आहे. येथील सर्वच मार्ग मोकळे केले जात आहेत, मात्र या वाहनांवर कारवाई करण्यासाठी क्रेन, टोईंग वाहन, वाहनतळ आदीची उपलब्धता करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.**

**-अतुल दहिफळे**, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरण वाहतूक शाखा

## बसमध्ये अश्लील चाळे करणाऱ्या युगुलाला न्यायालयाने सुनावला दंड

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रम सेवेच्या बसमध्ये महिनाभरापूर्वी एक प्रेमी युगल अश्लील चाळे करतानाची चित्रफीत समाजमाध्यमांवर पसरली होती. या प्रकरणानंतर एनएमएमटीवर टीकेची झोड उठली होती. एनएमएमएटी प्रशासनाने वाहकाला दोषी मानत निलंबित केले होते. विशेष म्हणजे याच वाहकाच्या फिर्यादीनंतर कामोठे पोलीस ठाण्यात संबंधित प्रेमी युगलाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला होता.

या प्रकरणी कामोठे पोलिसांनी त्या प्रेमी युगलाचा शोध घेऊन त्यांना नोटीस बजावली. या प्रेमी युगलांनी न्यायालयासमोर त्यांनी स्वतःची चूक कबूल केल्यानंतर या दोघांनाही प्रत्येकी दोन हजार रुपयांच्या दंड ठोठावून सोडण्यात आले.

पनवेल रेल्वेस्थानकासमोर असणारी एनएमएमटीची कल्याण मार्गावर धावणारी बस अर्धवट टप्पा वाहतुकीसाठी आयजीपीएल थांब्यापर्यंत तळोजापर्यंत सोडण्यात आली. आसूडगाव आगारापर्यंत बस येईपर्यंत बसमध्ये ८ ते ९ प्रवासी उरले होते. मागील आसनावर हे प्रेमी युगल बसले होते. बस कळंबोली सर्कलपर्यंत आल्यावर त्यांचे अश्लील चाळे सुरू असतानाची चित्रफीत त्याच सर्कलच्या इतर मार्गावर सिग्नलवर उभ्या असणाऱ्या इतर प्रवाशाने बनवली होती. तब्बल चार दिवसांनी ही चित्रफीत समाजमाध्यमावर वाऱ्यासारखी पसरल्यानंतर जेवढी चर्चा प्रेमी युगलांची झाली तेवढीच चर्चा एनएमएमटी बससेवेची झाली.

कामोठे पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंदण्यात आला. दरम्यान, न्यायालयाने प्रेमी युगलांना सोडून दिल्याचे समजल्यानंतर एनएमएमटी प्रशासनानेसुद्धा वाहक जाधव यांना कामावर परत रुजू करण्यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे.

## फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन महिलेकडून उकळले पैसे

**पनवेल : वार्ताहर**

शेजारी राहणाऱ्या विवाहित महिलेसोबत प्रेमसंबंध निर्माण करुन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या व्यक्तीने पिडीत महिलेचे अश्लिल फोटो आणि व्हिडीओ काढल्याचे तसेच त्याद्वारे त्याने सदर महिलेला धमकावून तिच्याकडून पैसे उकळल्याचे उघडकीस आले आहे. कळंबोली पोलिसांनी या व्यक्ती विरोधात खंडणीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील ४० वर्षीय पिडीत महिला कळंबोलीत राहण्यास असून तिच्यावर लैंगिक अत्याचार करून तिच्याकडून पैसे उकळणारा आरोपी रमजान नदाब कर्नाटकातील विजापूर येथे राहण्यास आहे. दोन वर्षांपूर्वी आरोपी रमजान कळंबोलीत पिडीत महिलेच्या शेजारी राहण्यास होता. त्यावेळी त्याने तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण केले होते. त्यानंतर रमजान विजापूर येथे गेल्यानंतर पिडीत महिला त्याला भेटण्यासाठी अनेकवेळा विजापूर येथे गेली होती. त्यावेळी त्याने पिडीत महिलेला तेथील लॉजवर नेऊन तिच्या सोबत शरीरसंबंध केले होते. तसेच त्याने पिडीत महिलेसोबतचे अश्लिल फोटो आणि व्हिडीओ काढले होते. हेच फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन त्याने पिडीत महिलेकडून पैसे उकळण्यास सुरुवात केली. मागील वर्षभरामध्ये त्याने धमकी देऊन पिडीतेकडून ऑनलाईन ८० हजार रुपये उकळले, मात्र त्यानंतरदेखील त्याने आणखी पैसे उकळण्यासाठी या महिलेला धमकावण्यास सुरुवात केली होती.

या धमकीमुळे त्रस्त झालेल्या पिडीत महिलेने कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी विरोधात खंडणीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

**पनवेल : भाजपचे माजी तालुका उपाध्यक्ष अमित नाईक यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी वहाळ ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, अखिलेश यादव, गोपी भोईर, सागर ठाकूर, गोपी भोईर, संदीप चव्हाण, कृष्णा सदादेवन, विकास राठोड, शेखर अण्णा, संस्कार नाईक, हर्ष नाईक आदी उपस्थित होते.**



## अनिल जाधव यांचा वाढदिवस उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

म्युन्सिपल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस आणि ज्येष्ठ कामगार नेते अनिल जाधव यांच्या साठाव्या जन्मदिनी त्यांच्या सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने पनवेल येथील काळण समाज हॉल येथे अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या विशेष प्रसंगी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, म्युन्सिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, कार्याध्यक्ष संतोष पवार आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

नितीन पाटील यांनी, अनिल जाधव यांचा संघर्षमय जीवनप्रवास अत्यंत प्रभावीपणे उलगडून दाखवला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभे राहत त्यांनी कामगार हक्कांसाठी दिलेला लढा अनुकरणीय आहे. त्यांच्या कार्यामुळे कामगार क्षेत्रात एक नवा मापदंड प्रस्थापित झाला असून, त्यांचे जीवन कार्य हे भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत त्यांनी गौरवोद्गार काढले.




## रांजणपाडा गावासाठी पनवेल मनपा पालिकेची यंत्रणा सज्ज

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर उपनगराच्या मध्यवर्ती भागी असणाऱ्या सेक्टर २७ येथे मलमिश्रित पाण्यामुळे अनेक ग्रामस्थांना अतिसार झाल्याच्या तक्रारी वाढल्या. हे वृत्त प्रसिद्ध झाल्यावर पनवेल महापालिकेच्या आयुक्तांनी तातडीने याची दखल घेत गावात घरोघरी आरोग्य सर्वेक्षण हाती घेतले. तसेच गावकऱ्यांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासाठी पालिकेने नियोजन केल्याची माहिती ग्रामस्थ उमेश चौधरी यांनी दिली. आरोग्याची आपत्ती भेडसावल्यावर पालिकेने तातडीने उचललेल्या पावलांमुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

जलवाहिनीतील गळतीमुळे मलमिश्रीत पाणी घरोघरी पुरवठा झाल्यामुळे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने मागील दोन दिवसांपूर्वी गावाची मुख्य जलवाहिनी बंद करून इतर वाहिनीची तपासणी हाती घेतली. पाच मजूर यासाठी गावात काम करत आहेत. पालिकेने बुधवारी सकाळपासून रुग्णवाहिका आणि डॉक्टरांचे एक पथक औषधांसहीत गावात तैनात केले होते.

अतिसारामुळे नागरिकांना अशक्तपणाच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे पालिकेच्या डॉक्टर व त्यांच्या पथकाने अनेक रुग्णांची घरोघरी जाऊन तपासणी केल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. रांजणपाडा या गावातील ग्रामस्थांना सिडको मंडळाच्या आणि पनवेल पालिकेकडून दोन संस्थांच्या पाणी पुरवठ्याच्या दोन वेगवेगळ्या जलवाहिनीतून पाणी पुरवठा केला जातो. सिडकोकडून येत असलेल्या जलवाहिनीतून दूषित पाणी आल्याने हा घोळ झाल्याचे बुधवारी सकाळी तपासणी दरम्यान उघडकीस आले. त्यानंतर जलवाहिनीवरील दुरुस्तीचे काम सिडको मंडळाने हाती घेतले.

## पनवेलमध्ये अभिनय प्रशिक्षण शिबिरास सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सात दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर पनवेल येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबीराचे उद्घाटन शुक्रवारी (दि.२३) महानगपालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले.

या उद्घाटनावेळी उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाहक शामनाथ पुंडे, अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, अमोल खेर तसेच प्रशिक्षक प्रा.रवि धुतडमल, संकेत खेडकर, प्रा. अशोक केंद्रे, प्रा. प्रज्ञा सोसे, संजय हळदीकर, नाट्यगृह व्यवस्थापक राजेश डोंगरे, क्रिडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख हरेश जाधव, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**◆ दोन गटात शिबिर**

**पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दोन गटात हे अभिनय शिबिर घेण्यात येणार आहे. यामध्ये पहिला गट वय वर्षे ८ ते १६ व दुसरा गट १६ ते ६० वयांपर्यंत आहे. सकाळी १० ते १ व दुपारी २ ते ५ अशा दोन टप्प्यात सात दिवस हे अभिनय शिबिर होणार आहे. शिबिरासाठी प्रत्येक गटामध्ये ३० /३० प्रशिक्षणार्थी आहेत.**

**◆ मान्यवरांचे मार्गदर्शन**

**प्रा. डॉ. जयंत शेवतेकर, अमोल भावे, डॉ. संजय पाटील, मकरंद पाध्ये आदी तसेच इतरही दिग्गज कलावंताचे मार्गदर्शन या शिबिरात होणार आहे. शेवटच्या दिवशी सर्व सहभागी शिबीरार्थींचे सादरीकरण होणार आहे. या अभिनय शिबिराचा समारोपप्रसंगी ३० मे ला मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. सर्व शिबिरांर्थींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.**

पनवेल महापालिका व अ.भा. मराठी नाट्य परिषदेच्या माध्यमातून प्रथमच अभिनय शिबिराचे आयोजन केले आहे. या अभिनय शिबीरामध्ये दिग्गज मान्यवरांचे मार्गदर्शन सर्व प्रशिक्षणार्थींना मिळणार आहे. या शिबिरातून घडलेले विद्यार्थी मराठी रंगभूमीवरती उत्तम सादरीकरण करून पनवेलचे नाव उंचावतील अशा अपेक्षा उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांनी व्यक्त केल्या. उपस्थित रंगकर्मींना सहाय्यक आयुक्त रूपाली माने यांनीही शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या.

पनवेलमधील नाट्यकलावंतांना अभिनयासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांचा विकास होण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण मिळावे याकरिता महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी महापालिकेमार्फत पुढाकार घेऊन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे उपाध्यक्ष तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या सहकार्यातून सर्वांसाठी विनामूल्य असे हे अभिनय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

## चित्र रेखाटून शहीद सैनिकाला श्रद्धांजली

**उरण : बातमीदार**

पहलगाम हल्ल्या नंतर भारतीय सैनिकांनी पाकिस्तान मधील दहशतवाद्यांना ऑपरेशन सिंदूर द्वारे जशास तसे उत्तर देऊन धूळ चारली. या ऑपरेशनदरम्यान भारतीय सैनिक संदीप गायकर यांना वीरमरण आले. देशासाठी ते शहीद झाले. त्यांना विविध क्षेत्रातून, विविध स्तरावर भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

उरणमधील सारडे गावचे सुपुत्र कुणाल रामचंद्र पाटील यांनी देशाच्या रक्षणासाठी आपल्या जीवाची पर्वा न करणाऱ्या देशासाठी शहिद होणाऱ्या सैनिकांना मानवंदना देण्यासाठी पेन, पेन्सिल, कोळसा या साहित्याचा वापर करून देशासाठी शहीद झालेले संदीप गायकर यांचे चित्र





कागदावर रेखाटले आहे.


चित्र रेखाटून त्यांनी शहीद झालेल्या भारतीय सैनिकांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. कुणाल पाटील हे एका कंपनीत काम करीत असून चित्रकलेची त्यांना लहानपणा पासूनच आवड आहे. पेन, पेन्सिल, कोळसाचा वापर करून त्यांनी आजपर्यंत अनेक चित्रे रेखाटली आहेत.

# राज खोसला जन्मशताब्दीनिमित्त...



झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

हिंदी चित्रपटसृष्टीतील माझ्या आवडत्या दिग्दर्शकांतील एक राज खोसला. भारतीय चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील एक अष्टपैलू दिग्दर्शक. ३१ मे १९३५ ही त्यांची जन्म तारीख. त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत असून यानिमित्त दक्षिण मुंबईतील रिगल चित्रपटगृहात त्यांनी दिग्दर्शित केलेल्या सी.आय.डी., मेरा गाव मेरा देश, बम्बई का बाबू या चित्रपटांच्या विशेष खेळाचे आयोजन करण्यात आले आहे. जुन्या काळातील चित्रपट रसिकांना ही एक उत्तम पर्वणी आहेच, शिवाय आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीलाही यानिमित्त हे जुने चित्रपट पहायची संधी आहे. मनोरंजन क्षेत्रात पाऊल टाकणार्यांना राज खोसला दिग्दर्शित चित्रपटांतून बरेच काही शिकता येईल.

यानिमित्त ॲम्बोरिश रॉयचौधरी लिखित राज खोसला यांची बायोग्राफी प्रकाशित होत असून ती चित्रपटसृष्टी, सिनेपत्रकार व चित्रपट रसिकांसाठी माहिती व मनोरंजनाचा खूपच मोठा खजिना ठरावा. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट चित्रपट काळापासून चित्रपटसृष्टी कशी बदलत बदलत गेली, तेथील दृष्टिकोन व मानसिकतेत कसे बदल होत गेले, कलेसाठी कला ते व्यवसायासाठी कला हा प्रवास यातील अनेक गोष्टी, माहिती, संदर्भ, तपशील, आठवणी या पुस्तकात नक्कीच वाचायला मिळतील.

राज खोसला हे दिग्दर्शक एकच, पण थीममध्ये केवढी तरी विविधता दाखवलेला असा व्हीजन असलेला अस्सल फिल्मवाला. क्राईम (सी. आय.डी., काला पानी, शरीफ बदमाश), सस्पेन्स थ्रीलर (मेरा साया, वो कौन थी), सामाजिक (सोलवा साल, बम्बई का बाबू), गूढ (अनिता), कौटुंबिक नाट्य (दो रास्ते), डाकूपट (मेरा गाव मेरा देश, कच्चे धागे, मेरा दोस्त मेरा दुश्मन), प्रेम त्रिकोण (प्रेम कहानी), नाट्यमय (मै तुलसी तेरे आंगन की), ॲक्शनपॅक्ड (नेहले पे देहला, दोस्ताना) वगैरे अनेक चित्रपट... आणि हे सगळे पडद्यावर साकारणारा दिग्दर्शक एकच, तो म्हणजे राज खोसला. (जन्म ३१ मे १९३५. लुथियाना, पंजाब) आणि याच वाटचालीत त्यांच्याकडे सहाय्यक दिग्दर्शक असलेले प्रमोद चक्रवर्ती, बप्पी सोनी हे कालांतराने स्वतंत्र दिग्दर्शक म्हणून कार्यरत झाले.

एखाद्याचे प्रगती पुस्तक अनेक गुणांनी भरलेले असावे तर हे असे. याचा अर्थ त्यांना लाल मार्क पडलाच नाही असे अजिबात नाही.

'चिराग' फसला म्हणून पब्लिकने नाकारला. यानंतरच्या निर्माते प्रेमजी यांच्या कार्यालयातील मिटींगमध्ये अपयशाची स्थिती बघून आपल्या मानधनातील अर्धा वाटा सुनील दत्तने परत केला (हा फक्त किस्सा नाही, असे जंटलमन चित्रपटसृष्टीत होते. ते दिवसच वेगळे होते), राज खोसला यांनी या फ्लॉपमधून बाहेर पडण्यासाठी अल्पावधीत एक चित्रपट करायचे ठरवले. राजेश खन्ना अजून स्टार झाला नव्हता, एकेक चित्रपट स्वीकारत होता आणि मुमताजने ज्युनियर डान्सरपासून सहनायिका, नायिका असा प्रवास सुरू केला होता. प्रेम चोप्राला मोठा ब्रेक हवा होता, बिंदूचीही हीच गरज होती. राज खोसलानी यांना घेऊन बनवलेला 'दो रास्ते' सुपर हिट ठरल्यावर ते पुन्हा फॉर्मात आले. (मुमताज तोपर्यंत सहनायिका म्हणून काम करत असल्यानेच शशी कपूरने तिला नायिका म्हणून स्वीकारण्यास नकार दिला. म्हणून 'दो रास्ते' राजेश खन्नाला मिळाला. मुमताज स्टार होताच शशी कपूरने 'चोर मचाये शोर'साठी तिला नायिका म्हणून स्वीकारले.) कालांतराने राज खोसला यांचे दो प्रेमी, दासी, तेरी मांग सितारो से भर दू, मांटी मांगे खून, सनी, मेरा दोस्त मेरा दुश्मन, नकाब हे सगळेच चित्रपट फ्लॉप. राज खोसलासारख्या कल्पक दिग्दर्शकाचा फॉर्म असा अचानक जावा? चित्रपटाच्या जगात काहीही घडू शकते हेच खरे आणि त्या चढउतारात यशाचा आधार खूपच गरजेचा!

वूमन इन व्हाईट या कादंबरीवर आधारित 'नकाब'साठी त्यांनी विनोद खन्नाला निवडला आणि मेहबूब स्टुडिओतील सेटवर शूटिंग रिपोर्टींगसाठी आम्हा सिनेपत्रकारांना आमंत्रित केले. विनोद खन्नाची ही सेकंड इनिंग होती आणि त्याने अनेक चित्रपट साईन केले. आता धावपळ होतेय म्हणून काही चित्रपट सोडलेही. त्यात 'नकाब' सोडल्याने ऋषि कपूर आला. मग फराहच्या बेभरंवशाच्या वागण्याचे किस्से गाजले. विनोद खन्नाला 'नकाब'मध्ये विशेष करण्यासाठी काही नाही असे वाटल्याने त्याने आजारपणाचे नाटक केले. आणि बरेच दिवस सेट तसाच सुनसान राहिला. त्याच्याऐवजी ऋषि कपूर आल्यावर पटकथेत काही बदल करण्यात आले. यात चित्रपट फसत गेला.

'नकाब' पूर्ण होताच पाली हिलवरील राज खोसलांच्या घरी जाऊन अगदी सविस्तर मुलाखत घेतली. लहानपणापासून आपण ज्यांचे चित्रपट कुठे गल्लीत, कुठे सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये, कधी मॅटीनी शोला, कधी दूरदर्शनवर पिक्चर एन्जॉय केले अशा दिग्दर्शकाशी संवाद करताना त्यांच्या चित्रपटांच्या थीममधील विविधता आणि गाण्यांचे अप्रतिम टेकिंग यावर बरीच माहिती मिळाली. आपल्याला खरंतर गायकच बनायचे होते. मुंबईत आल्यावर माटुंगा येथे राहताना पं. जगन्नाथराव पुरोहित यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे शिक्षणही घेतले. जवळपास राहत असलेल्या कुंदनलाल सैगल यांच्याकडे गच्चीतील रियाझला तै हजरही राहत. तेव्हा त्यांनी दुसरा सैगल बनण्याचे स्वप्नही पाहिले. ऑल इंडिया रेडिओवर अनाऊन्सर म्हणून नोकरी करीत असतानाच स्टेशन डायरेक्टर झेड.ए. बुखारी यांच्यामुळे संधी मिळेल तेव्हा रेडिओवर गायनही केले. रैन बसेरा (१९४७) या चित्रपटातील एक गाणेही गायले, पण तशी संधी मिळाली नाही.

देव आनंदशी भेट झाल्याने गुरुदत्त यांच्याकडे 'बाजी'पासून सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम सुरु केले (देव आनंद व राज खोसला हे मुळचे पंजाबच्या गुरदासपुरचे) आणि मग 'जाल' व 'बाज'साठी गुरुदत्तकडे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केल्यावर गुरुदत्त फिल्म्सच्या 'मिलाप' (१९५५) पासून स्वतंत्रपणे दिग्दर्शन सुरु केल्यावर गीत संगीत व नृत्य याला कायमच पसंती दिली असे अतिशय मोकळेपणाने राज खोसला यांनी सांगितले. गीत संगीतावर विशेष प्रेम म्हणून आपल्या दिग्दर्शनातील 'दो रास्ते'मध्ये तबकडीवर (ग्रामोफोन) एक बंगला बने न्यारा हे सैगलचे गाणे लावले, तर आपल्याच 'प्रेम कहानी'साठी ते यू तो हमने दिल के सफर मे देखे है दिलदार बहुत असे गुणगुणले. पडद्यावर ते राजेश खन्नाने साकारले.

गाण्यांच्या टेकिंगसाठी त्यांचे अनेक चित्रपट मी पुन्हा पुन्हा पाहिल्याचे सांगताच राज खोसला खुलले. कहीं पे निगाहे कहीं पे निशाना, यह है बम्बई मेरी जान, आँखो ही आँखो मे (सी.आय. डी.), हम बेखुदी मे तुमको, अच्छा जी मै हारी, नजर ना लागे (काला पानी), साथी ना कोई मंझिल, दीवाना मस्ताना हुआ दिल, देखने मे भोला है (बम्बई का बाबू), लग जा गले फिरसे, जो हमने दास्ता अपनी सुनाई, नैना बरसे रिमझिम रिमझिम, शोख नजर की बिजलीया (वह कौन थी), आप के पहलू मे आकर, नैनो मे बदरा छाये, तू जहा जहा चलेगा (मेरा साया), तुम बिन जीवन कैसे बिता (अनिता), तेरी आँखे के सिवा (चिराग), यह रेश्मी झुल्फे, बिंदीया चमकेगी, खिजा के फूल (दो रास्ते), मार दिया जाए, (मेरा गाव मेरा देश), प्रेम कहानी मे एक लडका होता है, फूल आहिस्ता फेको, चल दरिया मे डूब जाए (प्रेम कहानी), हाय हाय एक लडका मुझको खत लिखता है (कच्चे धागे), जाने क्या बात है, मेरी याद आयेगी आती रहेगी, और क्या अहदे वफा (सनी)... गीत संगीताचा जबरदस्त खजिना. प्रत्येक गाण्याचे रुपेरी पडद्यावरील सादरीकरण डोळ्यासमोर येते हे राज खोसलांचे मोठेच यश. ग.रा. कामत हे त्यांचे हुकमी पटकथाकार. 'दोस्ताना' सलिम जावेद लिखित होता, तर दो रास्ते आणि मै तुलसी तेरे आंगन की हे चित्रपट चंद्रकांत काकोडकर यांच्या मराठीतील कादंबरीवर आधारीत. त्यामुळेच कथानाट्य अस्सल व प्रभावी. कालांतराने राज खोसला यांचे सगळेच गणित बिघडले तरी 'सनी'मधील गाण्यात खोसला टच दिसला. 'जाने क्या बात है' असा गाण्याचा मुखडा परफेक्ट ठरला. मुळात राज खोसला यांना संगीताची विशेष आवड होती, गायक बनण्याची इच्छा होती. म्हणून त्यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गीत संगीत व नृत्य कायमच दर्जेदार राहिले. असे राज खोसला शूटिंगच्या वेळेस लंच ब्रेकनंतर हमखास अर्धा तास झोपणार हे जणू ठरलेलेच.

अशा राज खोसला यांच्या निधनाचे वृत्त (९ जून १९९१) पीटीआयने दिले तेव्हा मी 'नवशक्ती'च्या कार्यालयात होतो आणि संपूर्ण मुंबई, ठाणे जिल्ह्यात अक्षरश: मुसळधार पाऊस पडत होता आणि त्याच्या बातम्यांना बरीच स्पेस मिळणार हे स्पष्ट होते, पण राज खोसलाचे चित्रपटसृष्टीसाठीचे कॉन्ट्रीब्यूशन पाहता ही पहिल्या पानावरची बातमी होती... राज खोसला म्हणताच त्यांच्या दिग्दर्शनातील विविधता आणि लोकप्रिय गाणी आठवायला हवीतच.

राज खोसला यांचे हिंदी चित्रपटसृष्टीला बरेच काही देणे आहे. राज खोसलांच्या कर्तबगारीचे आणखी कौतुक व्हायला हवे होते हे निश्चित. रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'( १९७५)चे पन्नासावे वर्ष साजरे होत आहे. या शोलेची काही मुळे राज खोसला दिग्दर्शित मेरा गाव मेरा देश या चित्रपटात असल्याचे म्हटले जाते हेदेखील राज खोसला यांचे यशच. चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीत राज खोसला यांचे पर्व वैशिष्ट्यपूर्ण.

# भारत गौरव टुरिस्ट ट्रेन

## शिवरायांचा जाज्वल्य इतिहास अनुभवण्याची सुवर्णसंधी




छत्रपती शिवाजी महाराजांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन शिवरायांचा जाज्वल्य इतिहास अनुभवण्याची सुवर्णसंधी 'भारत गौरव टुरिस्ट ट्रेन'च्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. पर्यटन आणि इतिहासाची आवड असणाऱ्यांनी याचा लाभ घ्यावा.

भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (आयआरसीटीसी), ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा अनुभव देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या एका विशेष ट्रेनची घोषणा केली आहे. ही यात्रा भारत गौरव टुरिस्ट ट्रेन (भारत गौरव टुरिस्ट ट्रेन) अंतर्गत ९ जून २०२५पासून सुरू होत आहे.

या पाच दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत. या सहलीद्वारे महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांचा पर्यटकांना अनुभव घेता येणार आहे.

भारत गौरव ट्रेनच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी इतिहासाशी निगडीत धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांना व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्याचा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा मानस आहे. याबाबत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली पर्यटन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे, व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी आणि पर्यटन संचालक बी.एन. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

ही केवळ एक यात्रा नसून आपल्या वैभवशाली परंपरेचा, सांस्कृतिक वारशाचा आणि स्वाभिमानी इतिहासाचा साक्षात अनुभव घेण्याची सुवर्णसंधी आहे. भारतीय रेल्वे विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी ऐतिहासिक उपक्रमासाठी विविध अंगांनी सुसज्ज तयारी केली आहे. भारत गौरव ट्रेन ज्या-ज्या ठिकाणी पोहचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहिती पर्यटकांना देण्यात येणार आहे.

यात्रेदरम्यान सर्व प्रवाशांचा अनुभव सुखकर आणि संस्मरणीय व्हावा, यासाठी महामंडळाचे अधिकारी आयआरसीटीसीच्या समन्वयाने प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करतील. पाच दिवसांच्या या प्रवासात रेल्वेस्थानकांपासून ते गडकिल्ल्यांपर्यंत प्रत्येक ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणांचा वेध घेत पर्यटकांना समृद्ध अनुभव दिला जाईल. प्रत्येक गडकोटावर, ऐतिहासिक स्थळी पर्यटन व्यवस्थेचे काटेकोर नियोजन केले जाईल. इतिहासावर आधारित कार्यक्रम, गाईड्स तसेच स्थानिक शिवप्रेमी संघटनांच्या सहकार्याने ही यात्रा अधिक संस्मरणीय करण्यात येईल.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा तेजोमयी इतिहास, महाराष्ट्राची शौर्यशाली परंपरा, आणि आपली समृद्ध संस्कृती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्याच्या शासनाच्या ध्यासाला महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ संपूर्ण समर्पणाने साथ देत आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या पर्यटनाला नवे क्षितिज गवसणार असून प्रत्येक भारतीयाच्या हृदयात शिवप्रेमाची जाज्वल्य ज्वाला जागवली जाणार आहे. या प्रेरणादायी यात्रेत सहभागी होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वसा चालवावा, आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगावा आणि नव्या पिढीला या इतिहासाचे दर्शन घडवावे, अशी अपेक्षा आहे.

### सहल तपशील

सहलीचे नाव : छत्रपती शिवाजी महाराज सर्किट शुभारंभ ९ जून २०२५ कालावधी : पाच दिवसांची यात्रा (सकाळी समाप्ती) प्रारंभ व समाप्ती स्थान : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी), मुंबई प्रवास सुरू व संपण्याचे स्थानक : दादर, ठाणे यात्रेचा प्रवासमार्ग-मुंबई (सीएसएमटी)-रायगड-पुणे-शिवनेरी-भीमाशंकर-प्रतापगड-कोल्हापूर-पन्हाळा-मुंबई.

प्रमुख स्थळांची माहिती : रायगड किल्ला-छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक येथे झाला व ही राजधानी होती. लाल महाल, पुणे-छत्रपती शिवाजी महाराज यांचे बालपण येथे गेले. कसबा गणपती व शिवसृष्टी, पुणे-पुण्याचे ग्रामदैवत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील संग्रहालय. शिवनेरी किल्ला-छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ. भीमाशंकर ज्योतिर्लिंग-१२ ज्योतिर्लिंगपैकी एक प्रमुख धार्मिक स्थळ. प्रतापगड किल्ला-अफझल खानावरील ऐतिहासिक विजयाचे ठिकाण. कोल्हापूर-महालक्ष्मी मंदिर पन्हाळा किल्ला-बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याचे प्रतीक. पॅकेज शुल्क (प्रति व्यक्ती) उपरोक्त सहलीसाठी विविध पॅकेजेस तयार करण्यात आली असुन सोयीनुसार इकोनॉमी (एसएल), कम्फर्ट (३ एसी), सुपीरियर (२ एसी) अशा प्रकारच्या सुविधांची निवड करता येणार आहे. या पॅकेजबाबत सविस्तर माहिती (आयआरसीटी)च्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

पॅकेजमध्ये समाविष्ट सेवा : भारत गौरव ट्रेनने प्रवास (एसएल/३एसी/२एसी/एसी/नॉन-एसी) हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था सर्व ठिकाणी स्थानिक वाहतूक व गाईड ऑनबोर्ड व ऑफबोर्ड शुद्ध शाकाहारी भोजन प्रवास विमा, सर्व प्रवेश शुल्क (किल्ले, मंदिरे, रोपवे, शिवसृष्टी इत्यादी), सुरक्षा व्यवस्था.


पॅकेजमध्ये नसलेल्या सेवा : साहसी खेळ, बोटिंग इत्यादी. खोलीतील सेवांसाठी वेगळी रक्कम आकारली जाईल. इतर कोणताही वैयक्तिक खर्च. कोणतेही अतिरिक्त पर्यटनस्थळ.

दैनंदिन टूर कार्यक्रम (संक्षिप्त) : पहिला दिवस : मुंबई -रायगड-पुणे. दुसरा दिवस: पुणे (लाल महाल, शिवसृष्टी, कसबा गणपती). तिसरा दिवस :शिवनेरी-भीमाशंकर-पुणे. चौथा दिवस : प्रतापगड-कोल्हापूर. पाचवा दिवस : कोल्हापूर-महालक्ष्मी मंदिर-पन्हाळा किल्ला-मुंबई. सहावा दिवस : मुंबई (टूर समाप्त).

आरक्षण व अधिक माहितीसाठी संपर्क : भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (आयआरसीटीसी) वेबसाईट : www.irctctourism.com संकेतस्थळाला भेट द्यावी.

(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# 'फक्कड' : नोंद नसलेल्या इतिहासाची जिवंत साक्ष




साहित्य हे केवळ मनाचे रंजन करणारे साधन नाही, तर ते समाजाच्या काळजावर उमटलेला सत्याचा ठसा असते. अशा ठशांपैकी एक जळजळीत आणि अस्वस्थ करणारा ठसा म्हणजेच सचिन अवघडे यांची कादंबरी 'फक्कड'. ही केवळ एका पात्राची कथा नाही; ती आहे हजारो-लाखो उपेक्षितांच्या कष्टी, खडतर, आणि उपेक्षित आयुष्याची सामूहिक वहिवाट. 'फक्कड' या एका शब्दातच असंख्य उपेक्षितांचा, वंचितांचा, आणि श्रमिकांच्या आयुष्याचा आक्रोश दडलेला आहे. हा आक्रोश केवळ उपजीविकेचा नाही; तर तो आहे माणूस म्हणून ओळख मिळवण्याच्या संघर्षाचा.

कादंबरीचा नायक 'फक्कडराव' हा माणदेशाच्या कडाक्याच्या दुष्काळात जन्मलेला भूमिपुत्र. त्याच्या जीवनाची सुरुवात होते ती स्थलांतराच्या विवंचनेतून, ऊसतोडणीतील कष्टातून आणि उपेक्षेच्या जखमांमधून. काही कादंबऱ्या डोळे उघडतात; काही काळीज उघडतात. 'फक्कड' ही त्या दुर्मिळ कादंबऱ्यांपैकी आहे जी काळीज फाडून वाचकाला अंतर्मुख करते.

सचिन अवघडे यांचे लेखन म्हणजे अनुभवांची रसरशीत पेरणी. त्यांनी भोगलेल्या वास्तवाचं शब्दशः पुनरुच्चारण. उसाच्या फडात झोपवलेली लेकरं आणि त्यांच्यावर चाल करून आलेला अजगर या एकाच प्रसंगातून लेखकाने ग्रामीण मजुरांच्या असुरक्षित जीवनशैलीचं जे मर्म सांगितलं आहे, त्याचा कुठलाही आकड्यांमधला अहवाल किंवा शासनाचा सर्व्हे येवढं प्रभावीपणे सांगू शकत नाही.

'फक्कड'मधील प्रत्येक पान हे दुष्काळाच्या भेगांसारखं आहे. कोरडं, उबगवाणं, पण खोल अंतःकरणात जिरणारं. ही केवळ फक्कडरावाची कथा नाही, तर संपूर्ण मातंग समाजाच्या अस्तित्वाच्या लढ्याची काव्यात्म घोषणा आहे. गावकुसाबाहेरची त्यांची वस्ती, पारंपरिक व्यवसायांचा ऱ्हास, जातीपातीच्या छुप्या गुन्ह्यांचा वारसा आणि नव्या युगातील अस्थिर अस्मिता यांचे विलक्षण चित्रण लेखकाने केलं आहे. या संघर्षातून 'रघु'सारखा एक तरुण उमटतो, जो केकताड कापून दोरखंड तयार करण्यापेक्षा फक्कडतात्यासोबत आधुनिक काम शिकून जगू इच्छितो. ही केवळ शिक्षणाची नाही, तर स्वाभिमानाची घोषणा आहे. ही त्याची घोषणा केवळ एका पात्राची नाही, तर ती एका नव्या पिढीची अस्मितेची घोषणा आहे.

सचिन अवघडे यांची भाषा ही शास्त्रबद्ध नाही, पण शास्त्रीय वाटावी इतकी ती वास्तवाशी एकरूप आहे. गोडव्याचा खोटा मुलामा नाही, अलंकाराचा देखावा नाही पण जळजळीत आणि थेट काळजात भिडणारी ताकद आहे. त्यांची भाषा ही लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या परंपरेतील आहे. आणि हेच त्यांचं मोठेपण आहे त्यांनी अण्णाभाऊंप्रमाणे शब्दांनी मशाल पेटवली आहे. 'तारांबळ हेच जीवन आहे' हे विधान त्यांच्या संपूर्ण लेखनात अधोरेखित होतं. लेखक म्हणतात, अण्णाभाऊंनी गरिबांच्या आशेची मशाल जगभर नेली, त्यांच्या शब्दांनी मलाही साहित्यिक बनवलं. ही कबुली त्यांच्या लेखनाच्या जडणघडणीतून प्रकट होते. ही कबुली लेखकाच्या नम्रतेची आणि साहित्यविषयीच्या श्रद्धेची साक्ष आहे.

कादंबरीत ऊसतोडणीतील क्रूर अनुभव, गुन्हेगारीच्या उंबरठ्यावर उभं ठाकलेलं आयुष्य, चराटाचा धंदा, गरिबी आणि माणुसकीचा उरलेला श्वास या सगळ्याचा आशयघन पट शब्दबद्ध केला आहे. हे साहित्य आहे की दृश्यं? वाचकाला क्षणभर वाटून जातं की आपण एखादा अस्सल, हृदय हेलावणारा डॉक्युमेंट्री सिनेमा पाहतोय, पण इथे चित्रीकरण नाही, आणि कलाकार नाहीत. इथे फक्त 'फक्कड' आहे. खराखुरा, जिवंत अनुभव!

'फक्कड' ही कादंबरी वाचताना ज्यांनी वडापाव विकला आहे, झोपडीत राहून उद्या जगायची चिंता केली आहे, ऊसतोडणी केली आहे त्यांना ही कादंबरी स्वतःचीच वाटते. एकूणच, ज्यांच्या जीवनात आगीचा स्पर्श आहे, त्यांनाच ही कादंबरी भिडते. आणि ज्यांनी हे अनुभवलं नाही, त्यांच्यासाठी ही कादंबरी एक डोळस माणूस होण्याचा धडा ठरते.

'फक्कड' ही कादंबरी म्हणजे सामाजिक भान, आत्मकथनाची ताकद, आणि बदल घडवणाऱ्या शब्दांची चळवळ आहे. ही केवळ एका लेखकाची दुसरी साहित्यकृती नाही, तर ही आहे त्या लेखकाच्या जगण्याची स्वाक्षरी. 'फक्कड' या कादंबरीतून त्यांनी केवळ सामाजिक वास्तव मांडले नाही, तर ते बदलण्याची चुणूकदेखील दाखवली आहे.

सचिन अवघडे यांनी एका जिवंत माणसाच्या जीवनाची पोतडी उलगडली आहे. ती ही अशा भाषेत की जी प्रत्येक वाचकाचे अंतरंग ढवळून काढेल. 'फक्कड' ही केवळ एका माणसाची कथा नाही, तर ती आहे एकवटलेल्या, जिद्दी आणि झगडणाऱ्या समाजाचं प्रतिबिंब. ही आहे एका संपूर्ण वर्गाचा इतिहास. समाजाच्या तळागाळातलं आयुष्य, त्यांच्या वेदना, त्यांचे अपमान, त्यांची स्वाभिमानाची झुंज, त्यांचं माणूसपण. लेखनाच्या माध्यमातून या सगळ्यांना साहित्याच्या पातळ्यांवर साकार करणे ही सोपी गोष्ट नव्हे, पण सचिन अवघडे यांनी ती अत्यंत ताकदीने केली आहे. त्यांच्या साहित्यिक प्रवासाला आभाळभर शुभेच्छा..!

**-दिलीप भोसले**

# भुयारी मार्ग करण्यास तांत्रिक अडचण

## छोटा उड्डाणपूल उभारणीसाठी कर्जतमध्ये चाचपणी

**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून जुन्या फाटकाच्या जागेवर भुयारी मार्ग असावा, अशी कर्जत रेल्वे स्थानकाच्या पश्चिच बाजूला असलेल्या भिसेगाव परिसरातील नागरिकांची मागणी होती, मात्र तांत्रिक अडचणीमुळे भुयारी मार्ग होऊ शकणार नाही, असे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्याने त्या जागेवर छोटा उड्डाणपूल उभारता येईल का? याची चाचपणी करण्याचा निर्णय भिसेगाव ग्रामस्थ, नगर परिषद अधिकारी आणि रेल्वे अधिकाऱ्यांच्या समवेत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. कोणत्याही परिस्थितीत छोटा उड्डाणपूल करावा, असा आग्रह भिसेगाव परिसरातील नागरिकांचा आहे.



कर्जत रेल्वे स्थानक व्यवस्थापक प्रभासकुमार लाल यांच्या दालनात भुयारी मार्गा संदर्भात बैठकीचे आयोजन केले होते. माजी नगरसेवक संकेत भासे, पुंडलिक भोईर, पोलीस पाटील संजय हजारे, दिनेश कडू, शरद हजारे, महेंद्र गोसावी, मोहन भोईर, अभिजीत मुधोळकर, दिनेश भरकले, अमोघ कुलकर्णी, विनोद दुलगज आदी उपस्थित होते. रेल्वेचे विभागीय वरिष्ठ अभियंता एस. के. यादव, कनिष्ठ अभियंता प्रमोद कुमार नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक रवींद्र लाड, नगर अभियंता मनिष गायकवाड यांच्या उपस्थितीत ही बैठक सुरू झाली.

विभागीय वरिष्ठ अभियंता यादव यांनी जुन्या रेल्वे फाटाकाच्या जागेवर भुयारी मार्ग होणार नाही. कारण तो परिसर दलदलीचा आहे. त्यामुळे तेथे भुयारी मार्ग करणे शक्य होणार नाही. यावेळी संपूर्ण परिसराचा नकाशाचा अभ्यास करण्यात आला. त्यावर संकेत भासे यांनी भुयारी मार्गासाठी एमएमआरडीए कडून पंधरा कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. या निधीतून या जागेवर छोटा उड्डाणपूल करता येईल का? अशी विचारणा केली असता. यादव यांनी 'याबाबत पहाणी करावी लागेल. तेरा मिटर रुंदीचा उड्डाणपूल बांधता येईल का हे पहावे लागेल.

आम्ही सकारात्मक विचार करीत आहोत. तांत्रिकदृष्ट्या हा पूल उभारण्यात अडचण येत नसेल तर त्यासाठी नक्की प्रयत्न केले जातील. रेल्वेचे अधिकारी व नगरपालिका प्रशासन यांच्या समन्वयाने याबाबत चाचपणी करता येईल, असे स्पष्ट केले. मनिष गायकवाड यांनीही सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.


या जागेवर भुयारीमार्ग व्हावा. अशी या परिसरातील नागरिकांची मागणी होती. कारण तातडीची वैद्यकीय सेवा मिळविण्यासाठी किंवा गणेश विसर्जन मिरवणूकीसाठी तीन ते चार किलोमीटरचा वळसा घ्यावा लागतो. तो वाचवण्यासाठी येथे भुयारी मार्गाची आवश्यकता आहे. येथे भुयारी मार्ग व्हावा यासाठी अनेक वेळा मोजणी झाली.

एमएमआरडीए कडून भुयारीमार्ग तयार करण्यासाठी पंधरा कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यासाठी खासदार श्रीरंग बारणे आणि आमदार महेंद्र थोरवे यांनी प्रयत्न केले होते. मध्यंतरी या भुयारी मार्गाला देण्यात येणाऱ्या नावावरून वाद झाला होता. तो वाद मिटला, मात्र आता तांत्रिक अडचणीमुळे भुयारी मार्ग तयार करणे शक्य नाही असे सांगण्यात आले. त्यामुळे या परिसरातील लोकांचा या ठिकाणी छोटा उड्डाणपूल करून आमची गैरसोय दूर करावी, अशी मागणी आहे.

> **तांत्रिक अडचणीमुळे भुयारी मार्ग होणार नाही मात्र छोटा उड्डाणपूल कसा करता येईल. यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातील. एमएमआरडीए कडून पंधरा कोटी निधी मंजूर झाला असल्याने निधीची कमतरता पडणार नाही.**
>
> **-संकेत भासे, माजी नगरसेवक**

> **आम्ही जुने रेल्वे फाटक बंद होऊ नये म्हणून लढा दिला. त्याला हिंसक वळण लागले होते. आमच्यावर खटले दाखल झाले होते. त्याचा आयुष्यभर त्रास आम्ही सहन केला. आता भुयारीमार्ग होणार नाही हे ऐकून आमचे अवसान गळले आहे. काही करून छोटा उड्डाणपूल उभरावा अशी आमची विनंती आहे.**
>
> **-पुंडलिक भोईर, जेष्ठ ग्रामस्थ, भिसेगाव**

# माणगावात भारतीय सैनिकांच्या शौर्याच्या सन्मानार्थ तिरंगा यात्रा





**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात भारतीय सैनिकांच्या शौर्याला सन्मान करण्यासाठी आयोजक करण्यात आलेला 'तिरंगा यात्रा' कार्यक्रम शनिवारी (दि.२४) भारत माता कि जय, वंदे मातरम, जय जवान जय किसान, पाकिस्तान मुर्दाबाद, ऑपरेशन सिंदूरचा विजय असो अशा घोषणा देत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी समस्त माणगांव शहर व माणगांव तालुक्यातील राष्ट्रभक्त नागरिक यांच्यातर्फे आजी-माजी सैनिकांसह कुटुंबातील आई - वडिलांचा व वारसदारांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम परिसरात २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यामुळे भारतीयांच्या मनात पाकिस्तान विषयी प्रचंड चिड निर्माण झाली. या कृत्यामुळे संपूर्ण देशाचे मन व्यथित झाले. या घटनेला प्रत्युत्तर म्हणून केंद्र सरकार व भारतीय जवानांनी 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाणांवर जोरदार कारवाई केली.

भारतीय वीर जवान आपले प्राण पणाला लावून देशाच्या सुरक्षिततेसाठी सतत तत्पर असतात,त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी व संपूर्ण देशातील जनता ही जवानासोबत आहे हा संदेश पोहोचण्यासाठी माणगांव शहर व तालुक्यातील नागरिकांच्या वतीने सैनिकांच्या शौर्याला अभिवादन करण्यासाठी माणगांव बसस्थानक येथून कचेरी रोड मार्ग ते वीर यशवंत घाडगे स्मारक अशी हि 'तिरंगा यात्रा' काढण्यात आली.

हि तिरंगा यात्रा शहीद स्मारकपर्यंत पोहोचल्यावर याठिकाणी ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी असलेले माणगाव तालुक्याचे सुपुत्र रुपेश गायकवाड यांचा तसेच तालुक्यातील आजी माजी सैनिक व कुटुंबियांचा तसेच वारसदारांचा सत्कार करण्यात आला.

या तिरंगा यात्रा कार्यक्रमात माणगाव तालुक्यातील आजी-माजी सैनिक, माणगाव-तळा तालुका माजी सैनिक संघटना, युवा नेते निलेश थोरे, कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, माजी सैनिक संघटना विष्णू सावंत, सुरेश गायकवाड, अशोक विचारे, प्रकाश मोरे, यशोधरा गोडबोले, रचना थोरे, परेश सांगळे, उमेश साटम, गोविंद कासार युवराज मुंडे, वीर यशवंतराव घाडगे यांच्या वारस रजनी दर्गे, अमोल पवार, स्वराज्य करिअर अकॅडमी माणगावचे विद्यार्थी आदींसह समस्त माणगांव शहर व माणगांव तालुक्यातील राष्ट्रभक्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या तिरंगा यात्रेला उपस्थित असलेल्या माणगाव शहर व माणगाव तालुक्यातील राष्ट्रभक्त नागरिक यांचे युवा नेते निलेश थोरे यांनी आभार मानून कार्यक्रमाची उत्साहात सांगता केली.

## मांडवा गावासाठी पूर प्रतिबंधात्मक आराखडा तयार

**अलिबाग : प्रतिनिधी**

मांडव्यामध्ये लोढा अलिबाग हा प्रकल्प उभारत आहेत. मांडवा गाव आणि जेटीपासून फार लांब नसलेल्या या ठिकाणी, लोढा कंपनीने आपल्याभोवती असलेल्या भागातील 'भाग', 'मांडवा' आणि 'धोकवडे' या गावांमधील पूरस्थिती टाळण्यासाठी पूर प्रतिबंधात्मक आराखडा तयार केला आहे.

या आराखड्याच्या निर्मितीसाठी पूर व्यवस्थापन क्षेत्रातील प्रसिद्ध तज्ज्ञांना सहभागी करण्यात आला आहे. यात टाटा कन्सल्टन्सी इंजिनीअरिंग सर्व्हिसेस, न्यू यॉर्कमधील लेव्हल इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक बायरन स्टिगे, आणि एन्व्हायरो-कॉन अर्बन हायड्रो एन्व्हायर्नमेंट सेंटरचे संचालक डॉ. विनय निकम यांचा समावेश आहे.

## धम्मशील सावंत यांची नियुक्ती

**पाली :** कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या रायगड जिल्हा अध्यक्ष या पदावर पत्रकार धम्मशील सावंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

धम्मशील सावंत हे विविध वृत्तपत्राचे पत्रकार असून एका टीव्ही चॅनलचे पत्रकार असून त्यांनी अनेक विषय निर्भीडपणे समाजासमोर मांडले आहेत तर अनेकांना पत्रकारितेतून न्याय दिला आहे. भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढ्यात ते मागील काही वर्षांपासून सहभागी आहेत. या ऐतिहासिक न्यायालय लढ्यात धम्मशील सावंत जनजागृतीचे काम तन, मन आणि आपले सर्वस्व लावून करतील अशी अपेक्षा व्यक्त करीत पुढील कार्यास दादाभाऊ अभंग व सहकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## गोवठणे येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**उरण : प्रतिनिधी**

पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची वर्षभराची दहावीची क्लासची फी बक्षीस रूपाने परत करणारे ग्रामीण भागातील देवांग क्लासेस हे एकमेव क्लासेस आहे. त्यामुळे ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांसाठी देवांग क्लासेस हे वरदान आहे. असे गौरोदगार रंगनायक कृष्णकांत म्हात्रे यांनी गोवठणे येथे देवांग क्लासमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी काढले.



देवांग क्लासेसच्या वतीने गोवठणे येथे नुकताच क्लासमधील विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर स्थानिक मान्यवर, क्लासचे शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

यापुढे बोलताना कृष्णकांत म्हात्रे यांनी देवांग क्लासेसच्या १५ वर्षाच्या परंपरेचा उल्लेख करीत, देवांग क्लासेस हा विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदानाचे काम करत आहे. असे सांगून, उरण तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना परवडेल अशी माफक फी घेऊन अध्यापक नरेंद्र वर्तक हे क्लासेस चालवित असल्याचेही त्यांनी सांगितले. ते स्वतः या देवांग क्लासेसचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. गरिब-गरजूंच्या मुलांना परवडेल अशी फी घेऊन क्लासेस चालविणाऱ्या व्यवस्थापकीय संचालक नरेंद्र वर्तक यांच्या देवांग क्लासेसचा सलग १५ वर्षे शेकडा शंभर टक्के निकाल लागत आला असल्याचाही त्यांनी या वेळी आवर्जून उल्लेख केला.

क्लासमधून दरवर्षी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांच्या टक्केवारीने विद्यार्थी हे उत्तीर्ण होत आलेले आहेत. या देवांग क्लासेसचा दहावीचा जो विद्यार्थी क्लासमध्ये प्रथम येतो. त्या विद्यार्थ्याची क्लासची वर्षभराची फी बक्षीस रुपाने त्या विद्यार्थाला परत केली जाते. हे या देवांग क्लासचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे, असे अनेक मान्यवरांनी भाषणात सांगितले.

# मोहोपाड्यात अतिक्रमणावर कारवाई

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील मोहोपाडा हे मुख्य बाजारपेठेचे केंद्रबिंदु आहे. गावाच्या प्रवेशद्वारासमोर मासळी बाजार असल्याने गावात प्रवेश करताना दुर्गंधीला सामोरे जावे लागते.नागरिकांनी ग्रामपंचायतीला पत्रव्यवहार करून सदस्यांना मासळी बाजारानजीकचे अतिक्रमण हटवावे म्हणून मागणी केली होती.



यातच पंचशीलनगरहून मासळी बाजाराकडे येणारा सांडपाणी नाला वारंवार तुंबून पाणी रस्त्यावर येत असल्याने मासळी बाजाराच्या परिसरात दुर्गंधी व आरोग्याला हानीकारक आजार उद्भवण्याची अधिक शक्यता बळावत होती. यावर वासांब (मोहोपाडा) ग्रामपंचायत आयएसओ व स्मार्ट पुरस्काराने सन्मानित कशी, अशी नागरिक चर्चा करायचे. शिवाय मोहोपाडा मैदानाजवळच्या पार्कींगला वाहने जात असताना बसथांब्याजवळील अतिक्रमण व समोरच उघड्यावर बसणारे मच्छी विक्रेते यामुळे मोहोपाडा प्रवेशव्दाराला बकाळ स्वरुप असल्याचे चित्र आहे. यावर वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीने तोडगा न काढल्यास मोहोपाडा ग्रामस्थ आंदोलनाच्या पावित्र्यात होते. तसा सह्यानिशी पत्रव्यवहारही करण्यात आला होता. यावर ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील यांनी मासळी विक्रेत्यांना नोटीस पाठविणार असल्याचे सांगितले होते.

दरम्यान, मासळी बाजाराची बिकट अवस्था पाहून सरपंच उमा संदिप मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोपाडा स्थानिक सदस्या रसिका राकेश खराडे, सदस्या प्रतिक्षा रोशन राऊत, सदस्य आकाश जुईंकर, सामाजिक कार्यकर्ते राकेश खराडे, माजी सरपंच रोशन राऊत यांनी शुक्रवारी सकाळपासूनच पंचशील ते मासळी बाजार नाल्याचे खोदकाम करून अतिक्रमण केलेल्या शेड, टपरी, हातगाडी हटविली.यावेळी नागरिकांनी मोहोपाडा बसथांब्याजलळील चिकन दुकान व उघड्यावर बसणारे मासळी बाजार कायमचे हटवा, अशी मागणी केली.

मासळी बाजारानजीकच्या दुकांनामुळे बसथांब्यावर प्रवासी बसत नाहीत. यामुळे ते रस्त्यावर थांबतात. यातच कोणी प्रवाशाचा अपघात झाल्यास वासांबे ग्रामपंचायत अधिकारी आणि कमिटी जबाबदार असतील असे काही प्रवाशांनी ठणकावून सांगितले.

### मासळी बाजाराचा प्रश्न

**मासळी बाजारानजीकचे अतिक्रमण जमीनदोस्त न केल्यास आम्ही मोहोपाडा ग्रामस्थही दुकांनांसाठी बांधकाम करू असे स्थानिक बेरोजगारांसह मोहोपाडा शिवनगर स्थानिक ग्रामस्थांनी गाव बैठकीत ठरविले आहे. यावर वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायत पुढील काय कारवाई करते याकडे रसायनी करांचे लक्ष लागले आहे.**

# भर उन्हाळ्यात पावसाळी पर्यटनाचा आनंद

## ताम्हिणी घाटासह सुधागडात धबधबे वाहू लागले

**पाली : प्रतिनिधी**

मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. आणि हा अवकाळी मुसळधार पाऊस थांबायचे नाव घेत नाही आहे. परिणामी ठिकठिकाणी आता धबधबे वाहू लागले असून उन्हाळ्यात पर्यटक पावसाळी पर्यटनाचा आनंद घेताना दिसत आहे. ताम्हिणी घाट, सुधागड व इतर डोंगराळ प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात धबधबे वाहताना दिसत आहेत.



**वातावरण आल्हाददायक, पर्यटक सुखावले**

*उन्हाच्या काहीलीने तापून निघालेली सृष्टी अवकाळी पावसामुळे आता थंड झाली आहे. सर्वत्र गारवा पसरला असून वातावरण आल्हाददायक झाले आहे. परिणामी रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आलेले पर्यटक देखील सुखावले असून पर्यटनाचा आनंद घेत आहे. मुसळधार पाऊस आल्यास मोठ्या प्रमाणात धबधबे वाहू लागतात आणि त्यामुळे पर्यटक आणि नागरिक या धबधब्यांचा आनंद घेतात.*

या अवकाळी पावसामुळे येथील सृष्टी न्हाऊन निघाली आहे. तसेच वातावरण आल्हाददायक बदल झाले आहेत. वातावरणात गारवा पसरला आहे. शिवाय प्राणी पक्षी देखील सुखावले आहेत. अवकाळी पावसामुळे नागरिक तसेच पशुपक्ष्यांनाही वाढत्या उष्म्यापासून दिलासा मिळाला आहे. नागरिकांना गारव्यामुळे सुखद अनुभूती मिळाली. पावसामुळे पशु पक्षी देखील आनंदी आहेत. त्यांनाही पाण्याची मुबलक उपलब्धता निर्माण झाली आहे.

पावसामुळे आकाशात काळे, पांढरे, राखाडी छटा असलेले ढग एकमेकांत गुंफलेले दिसतात. कुठे काळ्या ढगांच्या गर्दीत पांढऱ्या ढगांचे हलके फुलकीदार थर, तर कुठे काळ्या पांढऱ्या ढगांचे विलक्षण आकार लक्ष वेधत आहेत. ढगांच्या समूहातून सूर्याच्या किरणांचे झोत बाहेर पडताना दिसत आहेत, जणू स्वर्गाच्या दारात उघडलेली एक नैसर्गिक कलाकृती. ढगांच्या या अनोख्या जुगलबंदीमुळे आभाळ एक जिवंत चित्रपटाच्या पडद्यासारखे भासते. शिवाय विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाट ही होत आहे

वळीवाचा पाऊस किंवा अवकाळी पाऊस आला असला तरी या पावसामुळे मुंग्या व वाळवी यासारखे प्राणी सक्रीय झाले आहेत. तसेच सरडे, खेकडे, पाली व बेडूक हे देखील बाहेर पडतात. हे सर्व प्राणी अनेक पक्षांचे आवडीचे भक्ष असते. त्यामुळे अवकाळी पावसामुळे पक्षांना खाद्याची मात्र चांगली उपलब्धता झाली आहे. तसेच पावसामुळे अनेक ठिकाणी डबकी, नदी ओहोळ यांच्यात काही प्रमाणात पाणी साठले आहे. त्यामुळे पक्षांसह इतर प्राण्यांचीही पाण्यासाठी वणवण थांबली आहे. याशिवाय गवत देखील उगवले आहे.

> **सध्याच्या अवकाळी पावसामुळे काही ठिकाणी जंगल परिसरात लागलेले वणवे पूर्णपणे थांबले आहेत. वातावरणातील प्रदूषके खाली बसून प्रदूषण कमी झाले आहे. असहाय्य होत असलेल्या उन्हाळ्याच्या गर्मीमध्ये वातावरणात गारवा आला आहे. पशु पक्षांनादेखील गारवा व पाण्याची उपलब्धता झाली आहे.**
>
> **-शंतनु कुवेसकर, निसर्ग व पशुपक्षी अभ्यासक, माणगाव-रायगड**

> **अवकाळी पावसाने जिल्ह्यात धुमाकूळ घातला आहे. सतत पाऊस पडल्यामुळे आता नदी नाले व ओहोळ यांना पाणी आले आहे. आणि परिणामी डोंगर उतारावरून देखील मोठ्या प्रमाणावर पाणी वाहते. त्यामुळे ठीक ठिकाणी धबधबे ओसंडून वाहत आहेत. यामुळे पर्यटक मात्र सुखावले आहेत. ताम्हिणी घाटात वाहणारे धबधबे पाहण्यासाठी पर्यटक आवर्जून थांबतात.**
>
> **-ऋषी झा, कृषी सल्लागार, पाली**

## प्राणी-पक्ष्यांची तहान भागवण्यासाठी वाडगे वाटप

**खोपोली : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही डब्ल्यू.एफ.व्ही. अर्थात वॉटर फॉर व्हॉइसलेस या संस्थेच्या माध्यमातून मुक्या प्राणी आणि पक्षांसाठी पाण्याची सोय करण्याकरता मोफत वॉटर बाऊल वितरीत केले. ऑनलाइन रजिस्टर पद्धतीने प्राणी आणि पक्षी मित्र या वॉटर बाऊल मागणी करतात त्या अनुषंगाने डब्ल्यू. एफ. व्ही. ही संस्था संपूर्ण देशभर विविध ठिकाणी आपले उपक्रम राबवत असते.

खोपोली शहरातील शास्त्रीनगर भागातल्या हेल्प फाउंडेशनच्या कार्यालयात खालापूर तालुका पशु वैद्यकीय अधिकारी विष्णू काळे, श्रीकृपा एक्वेरियमचे प्रवीण शेंद्रे, हेल्प फाउंडेशनचे निलेश कुदळे आणि गोरक्षक हनीफ कर्जीकर यांच्या हस्ते बाऊलचे वितरण करण्यात आले. खोपोली शहर, मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग आणि खंडाळा घाटात मोक्याच्या ठिकाणी हे बाऊल ठेवले जाणार असून त्यामध्ये पिण्याचे पाणी भरण्याची व्यवस्थादेखील प्राणी आणि पक्षी मित्र दरवर्षीप्रमाणे यंदाही करतील असा विश्वास पशु वैद्यकीय अधिकारी विष्णू काळे यांनी व्यक्त केला, या पर्यावरण पूरक आणि मानवतावादी दृष्टिकोनातून आयोजित केलेल्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.




### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. रविंद्र त्रिंबक पवार** यांनी आमच्या अशिलाना समती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन : धसाखोशी (५५३३२९)
(PU-ID : 26592889459), तालुका-उरण, जिल्हा-रायगड

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३३/१ खाते क्रमांक : ३७१ | १ | ०.४१.३० पो.ख. ०.०३.५० **एकुण ०.४४.८०** | ३.३७ |
| **एकुण क्षेत्र ०.४४.८० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती नसल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २४/०५/२०२५**

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक - ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड -४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

# २० किलो गांजा जप्त; ४८ ठिकाणी छापे

## नशामुक्त अभियानांतर्गत सात जणांना अटक



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नशा मुक्त अभियानांतर्गत नवी मुंबई पोलिसांनी धडाडीची अजून एक कारवाई केली आहे. या कारवाईत गांजा विकणाऱ्या ४८ जणांच्या घरी छापे टाकण्यात आले. यात ४० लाख रुपयांचा २० किलो गांजा जप्त करण्यात आला असून सात जणांना अटक करण्यात आली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नशा मुक्त अभियान अत्यंत गांभीर्याने राबवले आहे. एप्रिलमध्ये आंतरराष्ट्रीय हायड्रो गांजा तस्करीची टोळी उघडकिस आणण्यात यश आले होते. त्यांच्याकडून दोन कोटी ७२ लाख रुपये किंमतीचा हायड्रो गांजा जप्त केला होता. त्यामध्ये गांजा विक्रेते, कस्टम अधिकारी, भारतीय पोस्ट अधिकारी, मध्यस्थी हवाला मार्फत पैसे व्यवहार करणारे अंगडीया व नवी मुंबई आयुक्तालयातील २ पोलीस अंमलदार यांना अटक करण्यात आली होती. यातील संशयित आरोपी हे डार्क वेबच्या माध्यमातुन हायड्रो गांजा परदेशातून मागवत होते.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात राहणाऱ्या अभिलेखावरील व संशयित अशा ४८ जणांची नावे शोधून काढण्यात आली. त्यांच्यावर कारवाईसाठी व्हिव्ह रचना आखण्यात आली. एकाच वेळी कारवाई करण्यासाठी सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस संदीप निगडे, यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखा, परिमंडळ-१ व २ कडील ५० पोलीस अधिकारी व १०० पोलीस अंमलदारांचे वेगवेगळे ४८ पथक स्थापन करण्यात आले.

या पथकाने एकाच वेळी ४८ संशियतांच्या घरी शुक्रवारी सकाळी पाच वाजता एकाच वेळी धाडी टाकण्यात आल्या. या ४८पैकी सात जणांच्या कडे ४० लाख रुपयांचा २० किलो ७०० ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ व रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.

या कारवाईमध्ये ७ आरोपींना अटक करण्यात आलेली असुन त्यांच्या विरूध्द तळोजा, कळंबोली, खारघर, रबाळे एमआयडीसी-२, वाशी-२ असे एकुण सात गुन्हे अमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत दाखल करण्यात आलेले आहेत. या कारवाईत अन्य काही जणांची नावे पुढे आले आहेत. त्यांचा शोध घेतला जात आहेत.

# सानपाडा येथे बंद खोलीला आग

## सुदैवाने जीवितहानी टळली



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा येथील सेक्टर १३ मधील शाह कॉम्प्लेक्स वन इमारतीच्या ए विंगच्या पहिल्या मजल्यावरील एका बंद खोलीला आग लागल्याची घटना शुक्रवारी पावणे नऊच्या सुमारास घडली. या आगीत खोलीतील दोन्ही बेडरूम्सना आग लागल्याने धूर पसरला आणि इमारतीत एकच खळबळ उडाली. या आगीत दोन्ही बेडरूम जळून खाक झाल्या आहेत.

खोलीतील रहिवासी विजय कुमार सिंग हे कुटुंबासह गावाला गेले असल्याने आग लागल्याच्या वेळी घरात कोणीही उपस्थित नव्हते. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, ही बाब सुदैवाची ठरली आहे. आग लागल्याची माहिती मिळताच वाशी अग्निशमन दल एक बंब घेऊन घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ कारवाई करत आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

प्राथमिक तपासात घराचा मुख्य विद्युत प्रवाह बंद न केल्याने शॉर्ट सर्किट होऊन आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेत खोली शेजारी गॅस पाईप लाईन असल्याने संपूर्ण इमारतीतील रहिवाशांमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र वेळेवर नियंत्रण मिळवल्यामुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेमुळे नवी मुंबईतील इमारतींच्या फायर ऑडिटचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# सुरळीत वीजपुरवठ्यासाठी युद्धपातळीवर सज्ज राहा -लोकेश चंद्र

**नवी मुंबई : बातमीदार**

अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल्याने राज्यभरात पुढील तीन ते चार दिवस वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने यंत्रणेसाठी हाय अलर्ट जाहीर केला आहे. या कालावधीसह पावसाळ्यातील सुरळीत वीजपुरवठ्यासाठी आपत्कालिन नियोजन करण्यात आले आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी शुक्रवारी (दि.२३) राज्यातील वीजपुरवठ्याचा आढावा घेतला. नैसर्गिक आपत्तीमुळे खंडित झालेला वीजपुरवठा तातडीने सुरू करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, मुख्यालय व परिमंडलस्तरावर २४X७ आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षाची लगेचच स्थापना करावी. कोणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले. व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या या बैठकीमध्ये संचालक (संचालन) सचिन तालेवार यांच्यासह राज्यातील मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते उपस्थित होते.

यंदा मान्सूनच्या आगमनापूर्वीच राज्यात वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची दररोज हजेरी सुरू आहे. अरबी समुद्रावर कमी दाबाचे क्षेत्र सध्या स्थिर असले तरी त्याच्या प्रभावामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. या परिस्थितीमध्ये सुरळीत वीजपुरवठ्याच्या उपाययोजनांसाठी ही बैठक झाली. दरम्यान, शुक्रवार (दि.२३) पासून मुख्यालय व राज्यातील आपत्कालिन व्यवस्थापन नियंत्रण कक्षांचे कामकाज सुरू झाले आहे.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले की, वीजपुरवठा खंडित झाल्यास तो तातडीने व वेळेत सुरू करण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. एखाद्या ठिकाणी दुरुस्ती कामाला वेळ लागणार असेल तर त्याबाबत संबंधित ग्राहकांना 'एसएमएस'द्वारे, व्हॉटसॲप ग्रुप्स, ट्वीटर व सोशल मिडिया, प्रसिद्धी माध्यमांद्वारे ताबडतोब कळविण्यात यावे. खंडित वीजपुरवठ्याच्या कालावधीबाबत मुख्यालयाकडून पर्यवेक्षण करण्यात येत आहे. शक्य असूनही वीजपुरवठा वेळेत सुरू झाला नाही, तर त्याची गंभीर दखल घेण्यात येईल. सुरळीत वीजपुरवठ्यासाठी कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही. त्यासाठी क्षेत्रीय वरिष्ठ अभियंत्यांनी मोठ्या व गंभीर बिघाडाच्या ठिकाणी स्वतः जाऊन दुरूस्ती कामांना वेग द्यावा तसेच महावितरणच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, असे स्पष्ट निर्देश लोकेश चंद्र यांनी दिले.

वादळवारा व मुसळधार पावसामुळे वीजयंत्रणेचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक परिमंडल स्तरावर विजेचे खांब, रोहित्र, वीजतारा, ऑईलसह इतर यंत्रसामग्री उपलब्ध ठेवावी. पावसामुळे नादुरुस्त झालेल्या वीज यंत्रणेच्या दुरुस्तीसाठी संबंधित अभियंते, कर्मचाऱ्यांना तसेच सर्व एजन्सींना मनुष्यबळ, सामग्री व वाहनांसह युद्धपातळीवर तयार राहण्याची सूचना लोकेश चंद्र यांनी केली. या पद्धतीने मान्सूनच्या आगमनानंतर पावसाळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी महावितरणच्या यंत्रणेने सज्ज राहावे असेही त्यांनी स्पष्ट केले.

# गाव कार्यासाठी प्रत्येक जण देणार एक दिवसाचा पगार; दिघाटी गामस्थांचा निर्णय



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जाणीव कर्तुत्वाची आपल्या माणसांची असा एक आगळावेगळा कार्यक्रम ग्रामस्थ मंडळ दिघाटी यांच्याकडून रविवारी (दि.१८) आयोजित करण्यात आला. या उपक्रमासाठी प्रत्येक गावातील नागरिकांनी त्यांचा एक दिवसाचा पगार या गाव कार्यासाठी देण्याचे ठरवले व अनेकांनी या उपक्रमास आर्थिक मदत केली.

गावातील नवीन पिढीला आधुनिक शिक्षणाची माहिती, संधी, स्पर्धा परीक्षांसाठी प्रोत्साहित करणे या संकल्पनेतून किरण पाटील, माजी उपसरपंच रोहिदास शेडगे, माजी सरपंच नरेश ठाकूर, तंटामुक्त गाव अध्यक्ष गजानन ठाकूर, माजी सरपंच अविनाश म्हात्रे, गजानन पाटील, ग्रामपंचायत सदस्य अमित पाटील, किशोर पाटील, बंटी पाटील, मनोज पाटील, राकेश पाटील, सुरेश पाटील अशा अनेक तरुणांनी एकमताने हा उपक्रम हाती घेतला आहे.

येत्या पाच-दहा वर्षांमध्ये गावातील किमान ५० मुले /मुली एमपीएससी, यूपीएससी, अशा वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा देऊन जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस अधिकारी व इतर उच्च पदावरील सरकारी अधिकारी म्हणून काम सांभाळून गावाचे नाव उज्वल करतील असा विश्वास ग्रामस्थांमध्ये निर्माण झाला आहे.

गावातील जे नागरिक वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पदावर कामाला आहेत त्यांची पूर्ण माहिती तसेच जे-जे विद्यार्थी वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण घेतलेले आहे जसे की आयटीआय, ग्रॅज्युएशन, इंजीनियरिंग, इ. अशी सर्व माहिती जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे एखाद्या कंपनीमध्ये एखादी जागा (व्हॅकन्सी) निघाली तर त्या जागेसाठी व्हॅकेंसीसाठी पात्र असणाऱ्या गावातील उमेदवाराला त्याची माहिती देता येईल आणि त्याच्यासाठी नोकरीची संधी उपलब्ध करून देता येईल, असे धोरण गावकऱ्यांनी ठेवून वाटचाल करायचे ठरविले आहे.

या कार्यक्रमांमध्ये गावातील सरकारी व खासगी निवृत्त ज्येष्ठ कामगारांचा तसेच सरकारी व सन्मानाच्या पदावर नोकरी करणार्या गावकर्यांचा सत्कार सोहळा पार पडला व त्याचबरोबर दहावी बारावी मध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच या कार्यक्रमांमध्ये कृषी अधिकारी दिनेश ढालपे यांनी शेती विषयी योजनांबद्दल गावातील नागरिकांना सविस्तर माहिती दिली. दिघाटीच्या ग्रामसेविका ज्योती कोंढवल यांनी शासकीय योजनांची माहिती दिली.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मार्गदर्शक हास्य प्रबोधनकार संजीवन म्हात्रे यांनी दहावी बारावी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. शैक्षणिक बाबतीत कोणतीही अडचण आल्यास आपण सर्वतोपरी मदत करू असेही संजीवन म्हात्रे यांनी सांगितले. या कार्यक्रमांमध्ये गावातील पहिली महिला पोलीस, सनदी लेखपाल होमगार्ड, आर्किटेक्ट, तसेच वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये काम करून गावकऱ्यांना विशेष मदत करणाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमांमध्ये कृषी अधिकारी दिनेश डालपे, ग्रामसेविका ज्योती कोंढवाल, सरपंच रजनी हिरामण ठाकूर, उपसरपंच सुनील गावंड, सर्व ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, गावाचे पहिले माजी सरपंच भाऊ कृष्णा पाटील, प्रख्यात कीर्तनकार सदानंद महाराज, सुरेश शेडगे एलआयसी एजंट व असिस्टंट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर ठाणे व रायगड जिल्हा रोटरी, ॲड. शंकर ठाकूर गुरुजी, उद्योजक एम व्ही पाटील आदी उपस्थित होते.

# कोविडसाठी नवी मुंबई पालिकेचा आरोग्य विभाग दक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्यातील काही भागात सध्या कोविड रुग्ण आढळल्याच्या बातम्या येत आहेत. त्या अनुषंगाने काळजी म्हणून ताप, सर्दी, खोकल्याचे रुग्ण आढळून आल्यास खबरदारीचा एक भाग म्हणून नागरिकांनी श्वसनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी काही बाबींचे पालन करणे गरजेचे आहे. त्यानुसार 'काय करावे' व 'काय करू नये' याबाबत खालील सूचनांचे पालन करावे असे सूचित करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, रुग्णालये येथे सर्दी, खोकला अर्थात आयएलआय व सारी रुग्णांवर उपचार करण्यात येतो. सध्याचा कोविडचा संभाव्य धोका लक्षात घेऊन आरोग्य विभागांतर्गत सर्व रुग्णालये व नागरी आरोग्य केंद्रे यांना व्हीसीव्दारे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यादृष्टीने खबरदारी घेत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचे आदेशानुसार महानगरपालिकेच्या वाशी, नेरूळ, ऐरोली येथील सार्वजनिक रूग्णालयांमध्ये प्रत्येकी ०५ बेड्स राखीव ठेवण्यात आलेले आहेत. तसेच माँसाहेब मीनाताई ठाकरे सार्वजनिक रुग्णालय, नेरूळ येथे चाचणी लॅब देखील उपलब्ध आहे.



खासगी वैद्यकीय व्यावसायिकांनाही याबाबत सतर्क राहण्याच्या व कोविड सदृश्य लक्षणे आढळल्यास महानगरपालिकेस सूचित करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. यासोबतच केंद्र व राज्य शासनामार्फत याबाबत वेळोवेळी प्राप्त होण्याऱ्या सूचनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात येईल.

तरी नवी मुंबईकर नागरिकांनी कोविडबाबत घाबरून न जाता आवश्यक काळजी घेणे गरजेचे आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक दक्षता घेण्यात आली असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता नाहक भीतीचे वातावरण पसरवू नये. मात्र सर्दी, खोकला, फ्लू सदृश्य लक्षणे आढळल्यास वैयक्तिक स्वच्छतेवर भर द्यावा तसेच वैद्यकिय सल्ला घ्यावा आणि आपल्या नजिकच्या नमुंमपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात अथवा रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावेत असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

### हे करा!

- खोकला किंवा शिंक येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक हे रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाकावे.
- साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवावेत.
- ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर रहावे.
- भरपूर पाणी प्यावे आणि पौष्टिक अन्न खावे.
- संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे वायुविजन (व्हेंटीलेशन) होईल याची दक्षता घ्यावी.

### हे करू नका!

- कोविड सदृश्य लक्षणे असल्यास हे करू नये :
- हस्तांदोलन टाळावे, टिश्यू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर करू नये.
- आजारी लोकांशी जवळचा संपर्क टाळावा.
- डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करू नये.
- सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये.
- डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेऊ नये.

क्लिक...क्लिक...!



मुरूड : तालुक्यातील काशीद समुद्रकिनाऱ्यांवर अनेक पर्यटक येत असतात. येथील उंट सवारीचा आनंद घेत असणाऱ्या पर्यटकांचे छायाचित्र.

# तरुणावर यशस्वी सेल बेस थेरेपी

**नवी मुंबई :** रायगडमधील महाड येथील २५ वर्षीय तरुण हा गेली १० वर्ष बेकर मस्क्युलर डिस्ट्रॉफी (स्नायुंचा आजार) या आजाराशी झुंजत होता. रुग्णाला आत्मविश्वासाने चालणे, शारीरीक संतुलन राखणे आणि नाचणे देखील शक्य नव्हते मात्र स्टेमआरएक्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक आणि रिजनरेटिव्ह मेडिसिन एक्स्पर्ट डॉ. प्रदीप महाजन यांनी केलेल्या यशस्वी उपचारानंतर आता या रुग्णाला नवे आयुष्य मिळाले असून तो कोणत्याही अडचणीशिवाय त्याची दैनंदिन दिनचर्या पुन्हा सुरू करत आहे. रुग्ण यश शरद शेख डॉक्टरांनी त्याला बेकर मस्क्युलर डिस्ट्रॉफी (स्नायुंचा विकार) असल्याचे निदान केले. रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियाने डॉ. प्रदीप महाजन यांच्याशी संपर्क साधला, ज्यांनी त्याला पुन्हा चालण्यास मदत केली.

# ३० संवर्गातील ६६८ पदांकरिता ८४ हजारांहून अधिक अर्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर 'गट-क' आणि 'गट - ड' मध्ये ३० संवर्गात ६६८ पदांसाठी सरळसेवेव्दारे होत असलेल्या भरती प्रक्रियेला उदंड प्रतिसाद लाभला आहे. २८ मार्च रोजी पदभरतीची जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत म्हणजेच १९ मे पर्यंत तब्बल ८४,७७४ इतके ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत.

प्राप्त अर्जांमध्ये सर्वाधिक २३३४७ अर्ज हे लिपिक-टंकलेखक संवर्गाच्या १३५ जागांसाठी प्राप्त झाले असून बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (हिवताप) संवर्गाच्या ५१ जागांसाठी १५,४४७ तसेच कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या ८३ जागांसाठी १४५५८ आणि स्टाफ नर्स / मिडवाईफ (ऋछ.च.) संवर्गाच्या १३१ पदांसाठी १२,६३४ अर्ज प्राप्त झालेले आहेत.

अर्ज दाखल करणाऱ्या पात्र उमेदवारांनी भरती प्रक्रिया संदर्भातील माहिती जाणून घेण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ (Website) www.nmmc.gov.in याला भेट द्यावी तसेच महानगरपालिकेचे अधिकृत फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर या सोशल मिडीया अकाऊंटला भेट द्यावी आणि सत्य व प्रमाणित माहिती जाणून घ्यावी. त्याचप्रमाणे याविषयी कोणत्याही प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या माहितीला बळी पडू नये अथवा अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# किल्ले रायगड रस्ता, लाडवली पुलाचे काम अर्धवट

## दिरंगाईबाबत ग्रामस्थांनी मांडली खासदार सुनील तटकरेंकडे व्यथा

**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवरायांची स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था असणे ही तुमच्या आमच्यासाठी लाजिरवाणी बाब असल्याची खिन्न प्रतिक्रिया खासदार सुनील तटकरे यांनी किल्ले रायगड रस्त्याच्या कामांबाबतच्या ग्रामस्थांच्या व्यथा ऐकून दिली.



किल्ले रायगड रस्त्याच्या कामात दिरंगाई व लाडवली पुलाच्या अर्धवट कामामुळे रायगड विभागातील व प्रामुख्याने लाडवली येथील ग्रामस्थ शुक्रवारी (दि.२३) आक्रमक झाल्याचे पहावयास मिळाले आणि त्यांनी आपली व्यथा महाडच्या दिशेने येत असलेले खासदार सुनील तटकरे त्यांच्यासमोर मांडली. या वेळी ग्रामस्थांनी किल्ले रायगड रस्त्याच्या कामाबाबत असलेल्या विविध समस्या व तक्रारींचा पाढा वाचला तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत व संबंधित ठेकेदाराकडून लाडवली पुलाच्या काँक्रीटीकरणाच्या कामाच्या पूर्ततेसाठी १५ मे २०२५ ही तारीख देण्यात आली होती, पण दिलेली तारीख उलटूनही या पुलावर अजूनही काँक्रीटीकरण झाले नसल्याने सध्या मान्सूनपूर्व झालेल्या पावसात पुलावर जागोजागी पाण्याची तळी साचली असल्याचे ग्रामस्थांनी खासदार तटकरेंच्या निदर्शनास आणून दिले.

या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रकल्प अधिकारी अक्षरा ढालके, कनिष्ठ अभियंता झेंडे इत्यादी अधिकारी व कर्मचारीदेखील उपस्थित होते.

म्हाप्रळ-पंढरपूर रस्त्याच्या कामाचीदेखील अशीच दुरवस्था असल्याचे आणि ठेकेदार कंपनीदेखील एकच असल्याचे ग्रामस्थांनी खासदार तटकरे यांच्या निदर्शनास आणून दिले. ग्रामस्थांच्या व्यथा जाणून घेत तटकरे यांनी अधिकाऱ्यांशी याबाबत चर्चा केली आणि ग्रामस्थांचा कंपनी व ठेकेदाराविरोधात असलेला रोष लक्षात घेऊन ठेकेदाराला किल्ले रायगड व म्हाप्रळ-पंढरपूर या दोन्ही दोन्ही रस्त्याच्या कामाच्या दिरंगाईबाबत दर दिवशी दहा ते पंधरा हजाराचा दंड ठोठावण्याची कारवाई तातडीने करण्याचे निर्देश दिले. दिलेले निर्देश व सूचना या तातडीने अमलात आणल्या गेल्या नाहीत, तर येत्या मंगळवारी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांना या कामांची सखोल चौकशी करून फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यासाठी खरमरीत पत्रव्यवहार करू, असा इशारादेखील त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.

या प्रकल्पासाठी काम करणारे कनिष्ठ अभियंता श्री. झेंडे यांच्याबाबत ग्रामस्थांमध्ये प्रचंड चीड व संताप या वेळी दिसून आला. आपली जबाबदारी झेंडे यांनी चोख पार पाडली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून त्यांची या प्रकल्पातून तत्काळ हाकलपट्टी करावी, अशी मागणीदेखील ग्रामस्थांनी खासदार तटकरेंकडे केली.

याबाबत तटकरे यांनी उपस्थित संबंधित अधिकाऱ्यांना श्री. झेंडे यांना या प्रकल्पातून हटविण्यात यावे अशा सूचना दिल्या; त्याचप्रमाणे ग्रामस्थांचा आपल्याबाबत असलेला रोष व अविश्वास अधिक प्रमाणात वाढला असताना आपण या पदावर काम करू नये, अशा पद्धतीचे आवाहनदेखील खासदार तटकरे यांनी झेंडे यांना सर्वांच्या उपस्थितीत केले.

पुढील ४८ तासात पावसाचा अंदाज पाहून ग्रामस्थांच्या या समस्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशा स्पष्ट सूचना व निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

## खोपोली विकास आराखडा हरकती, सूचना सुनावणासाठी कमिटी स्थापन

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहराचा नवीन सुधारित प्रारूप विकास आराखडा प्रशासक व मुख्याधिकारी डॉ.पंकज पाटील यांनी जाहीर केला आहे. त्यापूर्वी त्या आराखड्यावर नागरिकांकडून स्वीकारलेल्या सूचना व हरकतीवर सुनाणींसाठी चार सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये डॉ. पाटील यांच्यासह तीन सेवानृवित्त सहाय्यक महासंचालकांचा समावेश आहे.

प्रारूप विकास आराखडा तयार करण्यासाठी टंडन कंपनीतील एजन्सी दिली आहे त्यांनी सखोल अभ्यास करीत सुधारीत विकास आराखडा तयार केला आहे. खोपोली नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधींचा कार्यकाल संपुष्टात आल्याने सन -२०२१ अन्वये अंतर्भत केलेले कलम ३१७ (३) मधील तरतुदीनुसार दिनांक २८.१२.२०२१ पासून खोपोली नगर परिषद येथे प्रशासकपदी मुख्याधिकारी, यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे स्थायी समितीच अस्तित्वात नसल्याने नियोजन प्राधिकरणाच्या स्थायी समितीच्या सदस्यांऐवजी उक्त क्षेत्रातील प्रसिध्द प्रारुप विकास योजनेसाठी उक्त अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये गठीत करावयाच्या नियोजन समितीचे मुख्याधिकारी प्रतिनिधीत्व करत आहेत.

उक्त क्षेत्राच्या प्रसिध्द प्रारुप विकास योजनेसाठी उक्त अधिनियमांच्या कलम २८ (२) अन्वये गठीत करावयाच्या नियोजन समितीमध्ये नगर आणि प्रदेश रचना किंवा पर्यावरण यांच्याशी किंवा दोन्हीशी संबंधित असणाऱ्या बाबींचे विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असणारेनगर रचना सेवानिवृत्त सहसंचालक शरद ध. रणदिवे,सेवानिवृत्त सहायक संचालक, नगर रचना संभाजी वि. कांबळे, सेवानिवृत्त सहायक संचालक, नगर रचना श्यामराव रा. चव्हाण यांची नियुक्ती संचालक,नगर रचना मूल्यनिधारण महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालय यांचे आदेश करण्यात आली आहे.

हरकती, सूचनांच्या सुनावणीसाठी ६० दिवसांची मुदत असल्याचे माहिती प्रसिद्धपत्रकात म्हटले आहे.

# खोपोलीतील छत्रपती शाहू महाराज नाट्यगृह नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील सांस्कृतिक वारसा जपणे, त्याचे संवर्धन करणे तसेच नागरिकांच्या मनोरंजनासाठी खोपोली नगरपालिकेने उभारलेल्या छत्रपती शाहू महाराज नाट्यगृहाची दुरावस्था झाली होती. आमदार महेंद्र थोरवे यांनी तीन कोटींचा निधी उपलब्ध करीत पुन्हा नाट्यगृह जिवंत करण्याचे काम केले. या नाट्यगृहाच्या नुतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात असून दोन ते तीन महिन्यात पूर्ण होईल, असा विश्वास पालिकेचे मुख्याधिकारी व प्रशासक डॉ. पंकज पाटील नाट्यगृहाच्या कामाची पाहणी केल्यावर व्यक्त केला आहे.

खोपोली शहरातील नागरिकांना त्यांची सांस्कृतिक भूक भागविण्यासाठी वाशी, दादर मुंबईत जावे लागत असल्याने ही गरज ओळखून नगरपालिकेचे तत्कालीन नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकरांनी कोट्यवधींची निधी खर्च करून छत्रपती शाहू महाराज नाट्यगृह उभारले.



उद्घाटनही माजी केंद्रीय मंत्री, खासदार शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले होते. नाट्यगृह सुरू झाल्याने खोपोलीच्याही सौंदर्यात भर पडली होती, परंतु दोनच वर्षानंतर नाट्यगृहाला गळती लागली आणि होत्याचे नव्हते झाले. नाट्यगृहाची दुरवस्था होऊन पडदा कोसळला आणि खोपोलीतील रसिकांचे डोळे पाणावले होते.

आमदार महेंद्र थोरवे यांनी वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून जवळपास तीन कोटींचा निधी उपलब्ध करीत नाट्यगृहाला जिवंत करण्याचे काम केले आहे. ठेकेदाराने निश्वार्थीपणे काम करीत आहे. मुख्याधिकारी, बांधकाम अभियंते हे सतत कामची पाहणी करीत दर्जेदार काम करून घेत आहे. सद्यस्थितीत काम ६० टक्के पूर्ण झालेले असून विद्युतविषयक व साऊंड सिस्टिमचे काम बाकी आहे. नाट्यगृहाची एकूण आसन क्षमता पाचशेच्या आसपास इतकी असून दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी तळमजल्यावर पार्किंगची सोय करण्यात आलेली आहे.

दरम्यान, मुख्याधिकारी व प्रशासक डॉ. पंकज पाटील, बांधकाम अभियंता अनिल वाणी, अविनाश गायकवाड, सतीश हडप, विद्युत विभागाचे तरडे, कन्सलटिंग आर्किटेक्ट ऋतुजा थोरवे, ठेकेदार राकेश गायकवाड इत्यादी प्रशासनातील अधिकाऱ्यांनी नाट्यगृहाच्या कामाची पाहणी केली.

मुख्याधिकारी व प्रशासक डॉ. पंकज पाटील यांनी काही सूचना केल्या. लवकरच या नाट्यगृहात तिसरी घंटा वाजणार यामुळे नाट्यरसिक व नागरिकात आनंदाचे वातावरण आहे, मात्र या नाट्यगृहातील अनेक वस्तू चोरीला गेल्या असून या प्रकरणात अनेक स्थानिक भुरटे चोर असल्याची शंका उपस्थित केली जात आहे.

## सैनिकांच्या सन्मानार्थ म्हसळ्यात तिरंगा यात्रा

**म्हसळा : प्रतिनिधी**

ऑपरेशन सिंदूरचा विजय, आनंदोत्सव त्या अनुषंगाने तिन्ही सशस्त्र दलांचा सन्मान करणे आणि जनतेचे मनोधैर्य वाढविणे या उद्देशाने भाजपने संपूर्ण देशात तिरंगा यात्रेच्या उपक्रमाचे आयोजन केले होते. म्हसळ्यातही तिरंगा यात्रा काढण्यात आली होती.

तिरंगा यात्रेत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना अशा सर्वच पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. भाजप तालुका अध्यक्ष महेश पाटील, शहर अध्यक्ष शरद चव्हाण, तुकाराम पाटील, प्रसन्न निजामपूरकर, निलेश मांदाडकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा चिटणीस महादेव पाटील, म्हसळ्याचे नगराध्यक्ष संजय कर्णिक, शिवसेनेचे प्रसाद बोर्ले, रवींद्र लाड, रणजित जैन, सुशील यादव, विकास धारिया, शैलेश पटेल, सौरभ गोरेगावकर, भाजप महिला आघाडीच्या प्रमुख रेखा धारिया, अर्पणा ओक, मिनल ढवळे, नगरसेविका राखी करंबे, स्वप्नील चांदोरकर आदी सर्वपक्षीय होते. ऑपरेशन सिंदूर आणि तिरंगा यात्रेत या वेळी ग्रामीण भागांतून मोठ्या प्रमाणात महिलांची उपस्थिती होती.





## मुख्यमंत्री वयोश्री लाभार्थ्यांनी उपकरणे खरेदीचे प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

**रायगड** : मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना उपकरणे खरेदी करण्यासाठी अर्थसहाय देण्यात येते. योजनेंतर्गत विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक प्रमाणपत्र ३० दिवसांच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, येथे सादर करावे असे समाजकल्याण विभागाने केले आहे.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात २३१४२ अर्ज प्राप्त होते. त्यापैकी १६०२२ लाभार्थ्यांना बँकेच्या वैयक्तिक आधार संलग्न बचत खात्यात थेट तीन हजार रुपये लाभ वितरण करण्यात आला आहे. विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक प्रमाणपत्र ३० दिवसांच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रायगड कच्छिभवन, नमिनाथ जैन मंदिरा जवळ, श्रीबाग रोड, अलिबाग, जि. रायगड कार्यालयात सादर करायचे आहे.

# आज चौल बेलाई येथील महाकाली माता मंदिरात वाडी भरणे उत्सव

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल बेलाई येथे प्राचीन महाकाली मंदिराचा वर्धापन दिन व देवीचा वाडी भरणे उत्सव २५ मे रोजी साजरा करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात विखुरलेले त्वष्टा कासार ज्ञाती समाज बांधव देवीच्या उत्सवाच्या निमित्ताने एकत्रित येत आहेत.



प्राचीन चौल व्यापारी बाजारपेठ म्हणून प्रसिद्धीस असून येथून समुद्रखाडीमार्गे देश-विदेशात व्यापार सुरू होता. ऐतिहासिक काळात प्राचीन चौलला अन्ययसाधारण महत्त्व व वैभवशाली अशी ओळख सांगितली जाते. व्यापार उदिमाने येथे अनेक समाज, जातीचे लोकांचे बस्तान होते. त्यापैकी त्वष्टा कासार समाजाचा उल्लेख करावा लागेल. या समाजाचे इतिहासकालीन साक्षीदार असलेले चौल बेलाईनजीक महाकाली माता मंदिर हे जागृत देवस्थान पहावयास मिळते.

प्रतिवर्षी महाकाली मातेच्या मंदिरात देवीची वाडी भरणे व वार्षिक महोत्सव वैशाख महिन्यात शुद्ध एकादशीला देवीची वाडी भरण्याचा उत्सव साजरा करण्यात येतो. या उत्सवाच्या दिवशी रेवदंडा येथील चंद्रकांत दांडेकर यांच्या निवासस्थानाहून देवीचा मुखवटा पालखी निघून ती महाकाली मातेच्या मंदिरात प्रस्थान करते. या उत्सवासाठी महाकाली मंदिरात रंगरंगोटी व आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येते तसेच महाकाली मातेस फुलांनी सजविण्यात येते. या उत्सवाकरिता ठाणे, मुंबई, पुणेसह महाराष्ट्रात विखुरलेले समाज बांधव एकत्र येतात. या वेळी समाजाच्या विशेष कर्तृत्वान व्यक्तिमत्व असलेल्या अतिथीला मानाचे स्थान देऊन सन्मानाने गौरविण्यात येते. या दिवशी समाजाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

अलिबागहून १८ किमी अंतरावर चौलनाका येथून दोन किमी अंतरावर डोल समुद्र नावाच्या तलावानजीक चौल बेलाई पाखाडीकडे जाणाऱ्या रस्त्यात कालिका टाकीनजीक महाकाली मातेचे प्राचीन मंदिर आहे. प्राचीन काळी कुंडलिका समुद्र खाडीचे पाणी थेट मंदिरासमोर येत होते व तेथूनच होड्याने येथील व्यापार चालत असावा असे सांगितले जाते. सभोवार व्यापारी पेठ असावी व या पेठेत समाजाची माणसे असावी या मोठ्या भक्तिभावाने मंदिराची उभारणी केली असावी. कालातंराने येथील कासार समाज सर्वत्र स्थलांतरित झाला, पण मंदिराची मालकी हक्क आजही त्वष्टा कासार समाज ज्ञाती बांधव रेवदंडा यांच्याकडे आहे. समाजाच्या वतीने मंदिराचे व्यवस्थापन व धार्मिक विधी आदी कार्य पाहिले जातात. पूर्वी कालिका मंदिराच्या वाडीतून परिसरातील गुंराना पिण्यासाठी टाकीत सोडले जात होते. म्हणून या परिसरात कालिका टाकी म्हटले असे म्हटले जाते.

या मंदिराचा जीर्णोद्धार त्वष्टा कासार ज्ञाती संस्थान समाज रेवदंडा यांनी समिती नेमून २५ मे १९८६ साली सुरू केला. तब्बल १४ वर्षांनी या कामाची पूर्तता होऊन वैशाख शुध्द एकादशी १४ मे २००० रोजी अद्ययावत स्वरूपाचे सिमेंट क्रॉंक्रीटचे बांधलेले देखणे मंदिर समाजाला अर्पण करण्याचा भव्य सोहळा झाला. त्या वेळी सर्वत्र विखुरलेले ज्ञाती समाज बांधव या सोहळ्यास एकत्रत आले होते.

मंदिरात प्रवेश करतानाच मंदिराचे प्रवेशव्दार मनाला आकर्षन घेते. प्रवेशव्दारापुढे छोटा चौखांबी प्रवेशव्दार असून त्यावर एक कळस आहे. मंदिराचा मागील प्रशस्त गाभाऱ्यावरील कळस त्यापेक्षा जास्त उंचीचा व आकाराने मोठ्या घुमटावर आहे. कळसाच्या घुमटाभोवती गच्ची बांधलेली आहे. घुमट सुंदर असून मनमोहक नक्षीकाम करण्यात आले. कलाकसुरच्या माध्यमातून मंदिराचे सौदर्य वाढविण्यात आले.

महाकालीचे हे मंदिर पुरातन मंदिर आहे. जुन्या मंदिराच्या सभामंडपावरील लाकडी खांबावरील इ.स. १७०२ असा उल्लेख कोरलेला आहे. त्यावरून इ.स.१७०२ साली या मंदिराचा जीर्णोद्धार झाला असावा. म्हणजे मूळ मंदिर त्यापूर्वीचे असावयास हवे. कदाचित सन १६१२मध्ये मुघलांनी किंवा सन १६८१ साली सिद्धीने केलेल्या अप्पर चौलच्या विनाशाची झळ या मंदिरालाही पोहचली असावी आणि त्यानंतर सन १७०२मध्ये त्याचा जीर्णोध्दार केला असावा. मंदिरापुढे तेलणीचा खांब आहे, असे संबोधला जाणारा भग्न दगडी खांब आहे. कदाचित तो टेहळणी करण्याचा खांब असावा.

सन १९८९ साली जुलै महिन्यात अचानक मोठे वादळ झाले आणि वीज कोसळून गाभारा दुभंगला, परंतु देवीच्या मूर्तीला कसलाही अपाय झाला नाही. जणु काही महाकाली देवीनेच गाभारा पाडण्यास कासार ज्ञाती बांधवास संमती दिली. पुढे समाज बांधवांनी सर्वानुमते जुना गाभारा खोलून त्या ठिकाणी नवीन गाभारा बांधला.

# कृषी विभागाकडून तक्रार निवारण हेल्पलाईन, भरारी पथक आणि समित्यांची स्थापना

**रायगड : रामप्रहर वृत्त**

कृषी विभागाकडून गुण नियंत्रणासाठी तक्रार निवारण हेल्पलाइन, भरारी पथके व तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. निविष्ठांबाबत काही तक्रारी असल्यास तालुकस्तरीय तक्रार निवारण समितीकडे किंवा जिल्हा स्तरावरील तक्रार निवारण हेल्पलाइन क्रमांक ८८३०२६४३३५वर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना करण्यात येत आहे.

जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५-२६करिता बियाणे, खते व कीटकनाशके या कृषी निविष्ठांचा दर्जेदार तसेच सुरळीत व वेळेवर मुबलक पुरवठा होण्यासाठी कृषी विभाग सातत्याने प्रयत्न करत आहे. निविष्ठांबाबतच्या गुणवत्ता नियंत्रणाकरिता जिल्हा स्तरावर व प्रत्येक तालुका स्तरावर भरारी पथके स्थापन केलेली आहेत. जिल्हास्तरीय भरारी पथकाचे कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद हे पथक प्रमुख, तर जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक हे सदस्य सचिव आहेत आणि तालुकास्तरीय भरारी पथकाचे तालुका कृषी अधिकारी हे पथक प्रमुख असून पंचायत समितीचे कृषी अधिकारी हे सदस्य सचिव आहेत.

प्रत्येक तालुक्यासाठी तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली असून समिती खते, बियाणे व किटकनाशकांच्या प्राप्त तक्रारींची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करेल. खरीप हंगाम २०२५-२६साठी जिल्ह्यातील ५६०१० हे क्षेत्रासाठी एकूण ५१९१ क्विंटल बियाणे आवश्यक आहे. खतांचे एकूण १२९०७ मे. टन एवढे मंजूर आवंटण आहे. जिल्हास्तरीय खरीप हंगाम आढावा सभेमध्ये पालकमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांना बांधावर खते, बियाणे वितरण मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या असल्याने चालू खरीप हंगामात कृषी विभागामार्फत या मोहिमेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांना कृषी सेवा केंद्रामध्ये तक्रार निवारण हेल्पलाइन क्रमांक, भावफलक, साठा फलक, परवाना तसेच कृषी सेवा केंद्रामध्ये लिंकिंग केले जात नाही अशा आशयाचा फलक दर्शनी भागात लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यस्तरीय खरीप हंगाम आढावा बैठकीमध्ये मुख्यमंत्री तसेच कृषीमंत्री महोदयांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कृषि निविष्ठा विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या कृषी सेवा केंद्र चालकांकडून नियमांचे आणि दिलेल्या सुचनांचे उल्लंघन होईल त्यांच्यावर कृषी विभागामार्फत कडक कारवाई करण्यात येईल.

### शेतकऱ्यांना आवाहन

सद्यस्थितीत जिल्ह्यात बियाणे व खते पुरवठा सुरळीत सुरू झालेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी सेवा केंद्रांमधून आवश्यक कृषी निविष्ठांची खरेदी करून ठेवावी तसेच बियाणे, खते व किटकनाशके खरेदीचे पक्के बिल घ्यावे व निविष्ठा वापर करताना सुरक्षा उपायांचे काटेकोर पालन करावे. निविष्ठांबाबत काही तक्रारी असल्यास तालुकस्तरीय तक्रार निवारण समितीकडे किंवा जिल्हा स्तरावरील तक्रार निवारण हेल्पलाइन क्रमांक ८८३०२६४३३५वर संपर्क करावा, असे आवाहन कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना करण्यात येत आहे.

# शुबमन गिल भारताचा नवा कसोटी कर्णधार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२५ स्पर्धा सध्या शेवटच्या टप्प्यात पोहोचली आहे. लवकरच या स्पर्धेतील प्लेऑफच्या सामन्यांना सुरूवात होणार आहे. ही स्पर्धा झाल्यानंतर भारतीय संघ कसोटी मालिका खेळण्यासाठी इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. २० जूनपासून दोन्ही संघांमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका रंगणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघाचे कर्णधारपद युवा फलंदाज शुबमन गिलकडे सोपवण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वीच भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केली होती. त्यामुळे इंग्लंड दौऱ्यावर भारतीय कसोटी संघाला नवा कर्णधार मिळणार हे स्पष्ट होते. कर्णधारपदासाठी काही नावे चर्चेत होती, ज्यात शुबमन गिलसह, जसप्रीत बुमराह, केएल राहुल आणि ऋषभ पंत यांचा समावेश होता. अखेर बीसीसीआयने ही जबाबदारी शुबमन गिलकडे सोपवली आहे. गिलकडे भारतीय संघाचे नेतृत्व करण्याचा अनुभव आहे.

या दौऱ्यावर रोहित शर्मा आणि विराट कोहलीसारखे अनुभवी खेळाडू नसणार आहेत. या अनुभवी खेळाडूंच्या अनुपस्थितीत युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आली आहे. उपकर्णधारपदाची जबाबदारी ऋषभ पंतकडे सोपवण्यात आली आहे. यासह करूण नायर, साई सुदर्शन, नितीश कुमार रेड्डी यांसारख्या खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला या संघात स्थान देण्यात आलेले नाही. त्याच्या जागी अर्शदीप सिंगचा संघात समावेश करण्यात आला आहे.

### इंग्लंड दौऱ्यासाठी संघ

शुबमन गिल (कर्णधार) यशस्वी जैस्वाल, ऋषभ पंत (यष्टीरक्षक/उपकर्णधार), केएल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन, करुण नायर, नितीश कुमार रेड्डी, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल, वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, अर्शदीप सिंग, आकाश दीप, कुलदीप यादव.

### मालिकेचे वेळापत्रक

- पहिली कसोटी : २० ते २४ जून – हेडिंग्ले, लीड्स
- दुसरी कसोटी : २ ते ६ जुलै – एजबॅस्टन, बर्मिंगहॅम
- तिसरी कसोटी : १० ते १४ जुलै – लॉर्ड्स, लंडन
- चौथी कसोटी : २३ ते २७ जुलै – ओल्ड ट्रॅफर्ड, मँचेस्टर
- पाचवी कसोटी : ३१ जुलै ते ४ ऑगस्ट – द ओव्हल, लंडन



### खेलो इंडिया बीच गेम्स

## पिंच्याक सिलॅटमध्ये महाराष्ट्र संघ उपविजेता

**पाली : प्रतिनिधी**

दिवच्या घोगला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या पहिल्या खेलो इंडिया बीच गेम्स स्पर्धेत पिंच्याक सिलॅट खेळात महाराष्ट्र संघाने तीन सुवर्ण, चार रौप्य व पाच कांस्य अशी एकूण १२ पदकांची कमाई केली. यासह गुणतालिकेत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी राहून उपविजेता ठरला.

पिंच्याक सिलॅट खेळातील उपविजेत्या संघातील खेळाडूंना महाराष्ट्राचे मुख्य प्रशिक्षक व राष्ट्रीय इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले, ओम शिंदे, आशिता यादव यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल महाराष्ट्राचे क्रीडा उपसंचालक व महाराष्ट्र संघाचे पथकप्रमुख नवनाथ फडतरे, महाराष्ट्र युवा संचालनालय स्पोर्ट्स इन्चार्ज अरुण पाटील, महाराष्ट्र राज्य पिंच्याक सिलॅट टीम मॅनेजर शंकर भास्करे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

**यशस्वी खेळाडू आणि पदके**

सुवर्णपदक : रिया राजेश चव्हाण, प्राजक्ता प्रभाकर जाधव, वैभव वाल्मिक काळे, जयश्री कैलास शेट्ये; रौप्यपदक : रामचंद्र दीपक बदक, सचिन अजिनाथ गर्जे, ओमकार गणेश अभंग, वैभव वाल्मिक काळे, अंशुल अरुण कांबळे; कांस्यपदक : किर्णाक्षी किशोर येवले, वैभव वाल्मिक काळे, कृष्णा नर्सिंग पांचाळ, मुकेश चंद्रप्रकाश चौधरी, सम्यक विनोद मार्कंडेय.

## रायगडचा १५ वर्षाखालील मुलींचा क्रिकेट संघ जाहीर

### निशिता विठलानी कर्णधार

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)च्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या आंतरजिल्हा १५ वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)चा संघ जाहीर करण्यात आला आहे. खोपोलीच्या निशिता विठलानी हिच्याकडे संघाचे नेतृत्व देण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्याचा संघ २९ मेपासून एमसीएच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरजिल्हा मुलींच्या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत सहभागी होणार आहे. मुलींच्या निवड चाचणी शिबिराचे आयोजन खारघर येथील बी.पी पाटील क्रिकेट अकॅडमी येथे करण्यात आले होते. शिबिरामध्ये मुख्य प्रशिक्षक व निवडकर्ता म्हणून नयन कट्टा व विनय पाटील यांनी काम पाहिले.

आरडीसीएचे उपाध्यक्ष राजेश पाटील, सहसचिव जयंत नाईक, सदस्य प्रदीप खलाटे यांनी निवड चाचणी व प्रशिक्षण शिबिरासाठी उपस्थित राहून खेळाडूंना मार्गदर्शन केले, तर अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी रायगड संघाला शुभेच्छा दिल्या आहेत.

संघ : निशिता विठलानी (कर्णधार), ब्रताती राय (उपकर्णधार), मधुरा बाबर व जिज्ञासा कडू (यष्टिरक्षक), निर्मयी चुनेकर, श्रीजा वाघमोडे, स्तुती विठलानी, आरोही लोखंडे, प्रियांसी गायकवाड, आरुषी जाधव, ज्ञानेश्वरी येरूणकर, काव्या माने, सान्वी कुमार, वैदेही वावेकर; राखीव खेळाडू स्वरा साळुंके, गीतांजली शर्मा, दिव्यांका धनावटे, प्राची शिंदे, वेदिका धनानी, अद्विता जाधव, वैष्णवी जाधव, दुर्वश्री साळुंके, त्रिशा सिंग.

## आयपीएलमध्ये सर्वाधिक वेळा २०० धावांचा नवा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

लखनऊच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध सामन्यात आयपीएलमधील मोठा विक्रम तुटला. या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने २०० धावांचा टप्पा ओलांडला. आयपीएल २०२५मध्ये सर्वाधिक वेळा २०० किंवा त्यापेक्षा धावा झाल्या आहेत. हा एक मोठा विक्रम आहे.

आयपीएलच्या गेल्या हंगामात एकूण ४१ वेळा २००+ धावा झाल्या होत्या. यंदा ४२ वेळा असा पराक्रम झाला आहे. आयपीएल २०२५मध्ये गुजरात टायटन्सने सर्वाधिक सात वेळा २०० धावांचा टप्पा ओलांडला आहे. पंजाब किंग्जने एकूण सहा वेळा अशी कामगिरी बजावली. या यादीत लखनऊ सुपर जांयट्स तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यांनी पाच वेळा २०० किंवा त्यापेक्षा अधिक धावा केल्या आहेत.

यानंतर राजस्थान रॉयल्सने पाच वेळा, कोलकाता नाईट रायडर्सने चार वेळा, मुंबई इंडियन्सने चार वेळा, सनरायझर्स हैदराबादने चार वेळा, आरसीबीने तीन वेळा आणि चेन्नई सुपर किंग्जने दोन वेळा २०० धावांचा टप्पा ओलांडला आहे.

## हैदराबादचा आरसीबीवर दमदार विजय

**लखनऊ : वृत्तसंस्था**

सनरायझर्स हैदराबाद संघाने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा ४२ धावांनी पराभव करून मोठा विजय मिळवला. इशान किशनच्या दमदार खेळीच्या जोरावर हैदराबादने २० षटकांत सहा विकेट्स गमावून २३१ धावा केल्या. प्रत्युत्तरात फिल साल्ट आणि विराट कोहली यांनी संघाला चांगली सुरुवात दिली, मात्र, त्यानंतर आरसीबीने एकापाठोपाठ विकेट्स गमावल्या. आरसीबीचा संघ १८९ धावांवर ऑलआऊट झाला.

लक्ष्याचा पाठलाग करताना कोहली आणि साल्टने आरसीबीला चांगली सुरुवात करून दिली. आरसीबीने पॉवरप्लेमध्ये एकही विकेट न गमावता ७२ धावा केल्या. हर्ष दुबेने विराट कोहलीला बाद करून आरसीबीला पहिला धक्का दिला. त्याने २५ चेंडूत ४३ धावा केल्या. कोहलीने सॉल्टसोबत पहिल्या विकेटसाठी ८० धावांची भागीदारी केली. कोहली बाद झाल्यानंतरही सॉल्टने आक्रमक खेळी सुरूच ठेवली. साल्टने २७ चेंडूत आपले



अर्धशतक पूर्ण केले. आरसीबीने नऊ षटकांत १०० धावांचा टप्पा ओलांडला.

साल्ट बाद झाल्यानंतर आरसीबीचा संघ डगमगला. आरसीबीने ठराविक अंतरानंतर एकापाठोपाठ विकेट्स गमावल्या. आरसीबीने १५ षटकांत तीन गडी गमावून १६७ धावा केल्या होत्या, मात्र त्यानंतर आरसीबीच्या कोणत्याही फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. हैदराबादकडून पॅट कमिन्सने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या, तर इशान मलिंगाने दोन विकेट्स मिळवल्या.

आरसीबीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतली होती. हैदराबादकडून अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी ५४ धावांची भागीदारी रचली. लुंगी एनगिडीने अभिषेक शर्माला बाद करून हैदराबादला पहिला धक्का दिला. यानंतर भुवनेश्वर कुमारने ट्रॅव्हिस हेडला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. हेनरिक क्लासेन आणि इशान किशन यांनी तिसऱ्या विकेट्ससाठी ४८ धावांची भागीदारी केली. सुयश शर्माने क्लासेनला बाद करून ही भागीदारी मोडली. क्लासेनने १३ चेंडूत दोन चौकार आणि दोन षटकारांसह २४ धावा केल्या. त्यानंतर अनिकेतने नऊ चेंडूत एका चौकार आणि तीन षटकारांसह २६ धावा केल्या.

या सामन्यातही नितीश रेड्डी स्वस्तात बाद झाला. त्यानंतर शेफर्डने अभिनव मनोबरला बाद केले, मात्र इशानने एका बाजुने फटकेबाजी सुरूच ठेवली. इशानच्या फलंदाजीच्या जोरावरच हैदराबादला २३० धावांचा टप्पा ओलांडला. आरसीबीकडून शेफर्डने सर्वाधिक दोन विकेट्स घेतल्या, तर भुवनेश्वर, एनगिडी, सुयश आणि कृणाल यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

## कोहलीची ‘विराट’ कामगिरी

### आरसीबीसाठी मारले तब्बल ८०० चौकार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लखनऊच्या एकाना स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये रोमांचक सामना रंगला. या सामन्यात हैदराबादने बाजी मारली, पण आरसीबीचा स्टार फलंदाज विराट कोहलीने आयपीएल स्पर्धेत एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

विराट कोहली एकाच संघाकडून ८०० चौकार मारणारा पहिलाच फलंदाज ठरला आहे. विराटने या डावात २५ चेंडूंचा सामना करत ४३ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने सात चौकार आणि एक षटकार मारला.

बंगळुरू संघासाठी सर्वाधिक चौकार मारण्याचा रेकॉर्ड हा विराट कोहलीच्या नावावर झाला आहे. विराटने या संघासाठी आतापर्यंत २६४ सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने ८०० चौकार खेचले आहेत. या यादीत जेम्स विंस दुसऱ्या स्थानी आहे. त्याने हॅम्पशायर संघासाठी खेळताना ६९४ चौकार खेचले आहेत, तर ॲलेक्स हेल्सने नॉटिंगहॅमशायर संघासाठी खेळताना ५६३ चौकार मारले आहेत. मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माने मुंबई इंडियन्ससाठी ५५० चौकार मारले आहेत, तर ल्यूक राईटने ससेक्स संघासाठी ५२९ चौकार मारले आहेत.

## हैदराबाद आणि बंगळुरू संघाला दंड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लखनऊ मधील अटलबिहारी वाजपेयी एकाना क्रिकेट स्टेडियमवर आयपीएल सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाचा सनरायझर्स हैदराबादच्या संघाने पराभव केला. या सामन्यात आयपीएलच्या आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल दोन्ही संघांच्या कर्णधारांना दंड ठोठावण्यात आला आहे.

आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार शुक्रवारी झालेला सनरायझर्स हैदराबाद विरुद्धचा सामना इम्पॅक्ट सब म्हणून खेळला. त्यांच्या जागी जितेश शर्माने आरसीबीच्या संघाचे नेतृत्व केले, तर हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्स होता. स्लो ओव्हर रेट राखल्यामुळे दोन्ही कर्णधारांसह खेळाडूंना दंड ठोठावण्यात आला आहे.

## नीरज चोप्राला पोलंडमध्ये रौप्यपदक

**वॉर्सा : वृत्तसंस्था**

पोलंडमध्ये शुक्रवारी झालेल्या ऑर्लान जानूझ कुसोझिंस्की मेमोरियल स्पर्धेत भालाफेकमध्ये भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा जर्मनीच्या ज्युलियन वेबरच्या मागे दुसऱ्या स्थानावर राहिला. या स्पर्धेत नीरज फॉर्ममध्ये दिसला नाही. अंतिम फेरीपूर्वी तो तिसऱ्या स्थानावर होता. सहाव्या आणि शेवटच्या प्रयत्नात ८४.१४ मीटर भाला फेकल्याने त्याने दुसऱ्या स्थानावर झेप घेतली.

दोहा डायमंड लीगमध्ये कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी करणारा नीरज पोलंडमध्ये त्याची पुनरावृत्ती करू शकला नाही. ज्युलियन वेबरने येथेही नीरजला मागे टाकले आणि सुरुवातीपासून शेवटपर्यंत आपले वर्चस्व कायम ठेवले. वेबरने ८६.१२ मीटर भाला फेकून विजेता ठरला. नीरजचे सहापैकी तीन प्रयत्न फाऊल घोषित झाले आणि शेवटच्या प्रयत्नात त्याने पुनरागमन केले. दोन वेळा विश्वविजेता राहिलेला ग्रेनाडाचा अँडरसन पीटर्स ८३.२४ मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह तिसऱ्या स्थानावर राहिला. दोहामध्येही तो तिसऱ्या क्रमांकावर राहिला होता.

भुवनेश्वर येथे २०२४च्या फेडरेशन कपमध्ये ८२.२७ मीटरच्या प्रयत्नानंतर नीरजची ८५ मीटरपेक्षा कमी अंतर भाला फेकण्याची ही पहिलीच वेळ आहे. दोहा डायमंड लीगमध्ये त्याने ९०.२३ मीटर अंतरापर्यंत भालाफेक केली. ९० मीटरपेक्षा जास्त अंतर कापण्याची ती पहिलीच वेळ होती.

## अँजेलो मॅथ्यूजची कसोटीतून निवृत्ती

**कोलंबो : वृत्तसंस्था**

आणखी एक दिग्गज खेळाडूने कसोटी क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे. श्रीलंकेचा अष्टपैलू खेळाडू अँजेलो मॅथ्यूज बांगलादेशविरुद्ध आपला शेवटचा कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. हा सामना त्याच्या कसोटी कारकिर्दीतील शेवटचा सामना असणार आहे.



अँजेलो मॅथ्यूजने आपल्या सोशल मीडियावर पोस्ट शेअर करीत कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केली आहे. त्याने आपल्या पोस्टमध्ये लिहिले की, माझ्या मित्रांनो, मी कृतज्ञ मनाने असंख्य आठवणींसह कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेत आहे. १७ वर्ष श्रीलंकेसाठी कसोटी क्रिकेट खेळणे हे माझ्यासाठी सर्वोच्च सन्मान आणि अभिमानाचे क्षण होते. ज्या वेळी आपण संघाची जर्सी परिधान करतो, त्या वेळी देशभक्ती आणि सेवाभाव याहून मोठे आणखी काहीच नसते. मी क्रिकेटला सर्वकाही दिले, मोबदल्यात क्रिकेटनेही मला खूप काही दिले. मी जे काही आहे, ते क्रिकेटमुळेच आहे.

अँजेलो मॅथ्यूज श्रीलंकेच्या दिग्गज खेळाडूंपैकी एक आहे. त्याने २००९मध्ये पाकिस्तानविरूद्ध झालेल्या सामन्यातून आपल्या कसोटी कारकिर्दीची सुरुवात केली होती. मॅथ्यूजने ११८ कसोटी सामन्यांमध्ये ८१६७ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने १६ शतके आणि ४५ अर्धशतके झळकावली आहेत. नाबाद २०० धावा ही त्याची सर्वोत्तम खेळी आहे.

गॉलचा मैदानावर होणारा कसोटी सामना हा त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ११९वा सामना असणार आहे. २००९मध्ये त्याने श्रीलंकेच्या कसोटी संघात पदार्पण केले होते. बांगलादेशविरुद्धचा सामना हा त्याच्या कसोटी कारकिर्दीतील शेवटचा सामना असणार आहे. वयाच्या ३७ व्या वर्षी तो कसोटी क्रिकेटला रामराम ठोकणार आहे.

## बीच सॉकरमध्ये महाराष्ट्राला कांस्यपदक

**दीव** : पदकांचा धडका कायम राखत पहिल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राने पाचव्या दिवशी बीच सॉकरमध्ये कांस्यपदकाची कमाई केली. पेंचक सिलट प्रकारात महाराष्ट्राच्या अंशुल कांबळेने रूपेरी यश संपादन केले.

घोघला समुद्र किनाऱ्यावर संपलेल्या बीच सॉकरमधील पुरूष गटात केरळने महाराष्ट्रावर ३-१६ गोलने मात केली. अंतिम फेरीत केरळने गोवा संघाला १२-४ गोलने पराभूत करीत सुवर्णपदक पटकावले. उपांत्य फेरीतील अपयशामुळे महाराष्ट्रसह लक्षदिप संघाला कांस्यपदक बहाल करण्यात आले.

पारंपरिक पेंचक सिलट प्रकारात महाराष्ट्रासह मणिपूर, नागालँड संघांनी वर्चस्व गाजवले. महाराष्ट्राच्या संघाने पेंचक सिलट प्रकारात सर्वाधिक पदकांची लयलूट केली. महाराष्ट्राच्या अंशुल कांबळेने रौप्यपदक जिंकून महाराष्ट्राच्या मोहिमेची रूपेरी सांगता केली.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com